उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०६.०२.२०२५ | अंक नं. २८५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार, अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# अहिल्यानगर तालुक्यातील गावागावांमध्ये बिबट्यांचा वावर वाढला; नागरिक भयभीत

## वनविभागाकडून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची होतेय मागणी



नगर – बेसुमार वृक्षतोड, भक्ष्य व पाण्याचा अभाव, यामुळे वन्यप्राणी मानवी वस्त्यांकडे धाव घेऊ लागले आहेत. नगर तालुक्यातील वनक्षेत्र भागात वन्य प्राण्यांची संख्या मोठी आहे. मात्र, लपायला जागा नसल्यामुळे, तसेच भक्ष्य मिळविण्यासाठी बिबटे मानवी वस्त्यांच्या परिसरात जावू लागल्याने तालुक्यात गावागावात बिबट्यांचा वावर वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे नागरिक, विशेषतः शेतात काम करणाऱ्या शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळेल त्या परिस्थितीत मिळेल ती शिकार करण्याचे कसब अंगी भिनलेले बिबटे जंगले नष्ट झाल्याने मोठ्या प्रमाणात विस्थापित होत आहेत. पोटाची भूक शमविण्यासाठी पारंपरिक शिकार मिळत नसल्याने ते साहजिकच मानवी वस्त्यांकडे वळले आहेत. मानवी वस्त्यांच्या शिवेवर येऊन मिळेल, त्या भक्ष्याची शिकार करताना त्यांचा जगण्यासाठीचा संघर्ष आता आणखी कठीण होत चालल्याचे दिसते. सध्या अशाच बिबट्यांनी नगर तालुक्यातील जेऊर, इमामपूर, देहेरे, विळद, चास, कामरगाव, भोरवाडी, सारोळा कासार, निमगाव वाघा, जखणगाव, चापेवाडी, ससेवाडी, नेप्ती परिसरातील झाडा-झुडपात बिबट्यांनी रानात ठाण मांडले आहे.

### शेतकऱ्यांच्या अनेक पाळीव प्राण्यांवर झालेत हल्ले

पारंपरिक शिकार मिळत नसल्याने, या परिसरातील पाळीव प्राण्यांवर हल्ले सुरू केले आहेत. गेल्या १० महिन्यांत जवळपास १२५ पाळीव प्राण्यांचा फडशा बिबट्यांनी पाडला आहे. मागील आठवड्यात सारोळा कासार परिसरात काळे वस्ती येथे एका शेतकऱ्याच्या घरासमोरून त्यांचा पाळीव कुत्रा बिबट्याने ओढून नेल्याची घटना घडली आहे. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जवळील शेतात असलेले पायांचे ठसे हे बिबट्याचेच असल्याचेही स्पष्ट केले होते. नगर तालुक्यात अजून माणसांवर हल्ला झाल्याची घटना सुदैवाने घडलेली नसली तरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी झालेल्या मानवांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर नगर तालुक्यातही पाळीव प्राण्यांपाठोपाठ त्यांनी माणसांवरही करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मागील महिन्यात ३ ठिकाणी पकडले बिबटे

जानेवारी महिन्यात भोरवाडी गावच्या परिसरात एक बिबट्या वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात कैद झाला. वन विभागाने तो जंगलात नेवून सोडला. या ठिकाणी आणखी ३ ते ४ बिबट्यांचा वावर असल्याचे समोर आल्यावर तेथे अजून २ पिंजरे लावण्यात आलेले आहेत. त्यानंतर जेऊर जवळील चापेवाडी शिवारात एक बिबट्या विहिरीत पडला होता. त्याला ही विहिरीतून बाहेर काढत वन विभागाने जंगलात सोडले आहे. मागील आठवड्यात निमगाव वाघा येथे एक बिबट्या विहिरीत आढळून आला. त्याला ही वनविभागाने बाहेर काढत जंगलात सोडले आहे. या शिवाय कामरगाव परिसरात बिबट्याचा मुक्त संचार वाढला आहे. ग्रामस्थांनी याबाबत वनविभागाला निवेदनही दिले. जेऊर परिसरही बिबट्याच्या दहशतीखाली आहे. चांदबिबी महल परिसरातही बिबट्याने अनेकदा दर्शन दिले.



नगर तालुक्यातील सारोळा कासारच्या बारेमळा परिसरात गुरुवारी (दि.६ फेब्रुवारी) सकाळी शेतात आढळलेले बिबट्याच्या पावलांचे ठसे.



ड्रोन कॅमेऱ्याद्वारे बिबट्याचा शोध घेताना वन विभागाचे कर्मचारी व शेतकरी.

### सारोळा कासारमध्ये आढळला बिबट्या व बछडा

सारोळा कासारच्या बारेमळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे गुरुवारी (दि.६ फेब्रुवारी) सकाळी वन विभागाला कळविण्यात आले. वन कर्मचारी काही शेतकऱ्यांच्या समवेत बिबट्याच्या पावलांच्या ठशांचा शोध घेत असताना तेथे अंदाजे ३ महिन्यांचा बछडा व त्या पासून काही अंतरावर झुडपात मादी बिबट्या त्यांना दिसला. त्यामुळे त्यांनी तेथून पळ काढत परिसरातील शेतकऱ्यांना सावध केले. तसेच खबरदारी म्हणून बारेमळा ते खडकी जाणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. वन कर्मचाऱ्यांनी ही बाब वन विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविली असून वनरक्षक मानसिंग इंगळे यांच्यासह वनकर्मचाऱ्यांकडून दुपारी उशिरापर्यंत ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने परिसरात बिबट्याचा शोध घेण्याचे काम सुरु होते. या परिसरात वन विभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. कारण बिबट्यासोबत त्याचा बछडा असल्याने तो आक्रमक होत मानवावर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी या परिसरात भीतीचे वातावरण आहे.

### बिबट्यापासून नागरिकांनी अशी घ्यावी काळजी

शेतकऱ्यांनी पाळीव जनावरे शक्यतो बंदिस्त गोठ्यात ठेवावीत. शेतात एकट्याने जाण्याची वेळ येईल, त्यावेळी हातात काठी ठेवावी, मोबाईल वर मोठ्या आवाजात गाणी लावावीत.सायंकाळी ६ ते ९ आणि पहाटे ५ ते ७ या वेळेत बिबटे शिकारीसाठी बाहेर पडत असल्याचे अभ्यासाअंती पुढे आले आहे. त्यामुळे शक्यतो, या वेळेत लहान मुले, स्त्रिया व एकट्याने बाहेर पडणे टाळावे.असे आवाहन वन विभागाने केले आहे.

### वनविभागाकडून उपाययोजना करण्याच्या अपेक्षा

नगर तालुक्यात अनेक गावांमध्ये बिबट्यांचा वावर वाढला असल्याने त्यांना पकडण्यासाठी वन विभागाने पिंजऱ्यांची संख्या वाढवावी. बिबट्या नरभक्षकाच्या व्याख्येत बसत असेल, तर त्याला पकडण्यासाठी तातडीने हालचाली करत तो हल्ला करण्याची वाट न पाहता त्याला पकडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. उपद्रव असलेल्या गावांमध्ये नागरिकांना खबरदारीच्या उपाययोजनांसंदर्भात जागरूक करणे. परिसरात कायम स्वरूपी वन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे अशा मागण्या गावागावातून केल्या जात आहेत.

# अनाधिकृत रिक्षा स्टॉप ठरताहेत वाहतुकीस अडथळा

## महिला, मुलींच्या छेडछाडीबरोबरच होताहेत लहान-मोठे अपघात; कारवाई करा : जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन

नगर – शहरातील तारकपूर बसस्टॅन्ड मधील अनाधिकृत रिक्षा स्टॉप हटविण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) च्यावतीने करण्यात आली आहे. बसस्थानकाच्या आतमध्ये असलेल्या रिक्षा स्टॉपमुळे वाहतूकीस अडथळा, महिलांची छेडछाड व लहान-मोठे अपघात घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर रिक्षा स्टॉप बसस्थानकाच्या आवारातून बाहेर हलविण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले. याप्रसंगी ओबीसी सेलचे उपाध्यक्ष विल्सन रुकडीकर, शहर जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ, बबलू मकासरे, निखिल मगर, शुभम रोकडे, जमीर सय्यद, जफर काझी, रईस शेख, दिलनवाज शेख आदी उपस्थित होते.

तारकपूर बस स्टॅन्डच्या आवारात एसटी महामंडळाच्या जागेत अनेक वर्षापासून बेकायदेशीररित्या रिक्षा स्टॉप सुरू आहे. सदर रिक्षा स्टॉपवर १५ ते २० रिक्षा थांबत असल्याने महामंडळाच्या बसेस यांना आत जाण्यास अथवा बाहेर पडण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रिक्षा चालक प्रवासी वाहतुक करताना येणाऱ्या व जाणाऱ्या बसचा विचार करत नाही; त्यामुळे अडचण निर्माण होत आहे. सदर रिक्षा स्टॉपमुळे सदर भागात लहान-मोठे अपघात घडत आहे. महामंडळाचे कर्मचारी देखील त्यांना वैतागले आहेत. परंतु काही रिक्षाचाल गुंड प्रवृत्तीचे असल्याने त्यांच्याशी वाद कोणीही घालत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नियमाप्रमाणे रिक्षा स्टॉप हे कोणत्याही बसस्टॅण्डच्या आत मध्ये नसते, परंतु तारकपूर एकमेव बसस्टॅण्ड असून, ज्याच्या आवारातच रिक्षास्टॉप आहे. नेमके हे रिक्षास्टॉप कोणाच्या आशीर्वादाने चालू आहे? याचा शोध घेणे देखील गरजेचे आहे. सदर रिक्षा चालक वाटेल ते भाडे आकारात आहे. रिक्षास्टॉप मधील काही रिक्षाचालक हे मद्य पाषाण करणारे आहेत. त्यांच्याकडून अनेकदा महिलांची छेडछाड झाली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. येथील रिक्षाचालकांच्या दहशतीमुळे तक्रार देण्यास कोणी पुढे येत नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे. शहरातील तारकपूर बसस्टॅन्ड मधील अनाधिकृत रिक्षास्टॉप हटविण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) च्यावतीने करण्यात आली आहे. *(छायाचित्र पान २ वर)*

उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich HÄFELE GRASS blum ITALICA ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 I 98222 94670.

पाहिजेत
• अकौंटट जागा 4
• कॅशिअर जागा 4
• सेल्समन जागा 10
• सेल्सगर्ल जागा 10
• हेल्पर जागा 5
A.H. पोखरणा ज्वेलर्स
साईदीप टॉवर, सर्जेपुरा, अ.नगर
सध्या कॉलनी, स्टेशन रोड, अ.नगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

फेब्रुवारी- मार्च पैसा वसूल टूर्स
VEENA WORLD
गर्दी कमी, पैसे कमी! सीजन मस्त, आनंद जास्त!
चलो बॅग भरो.. निकल पडो...
हनिमून स्पेशल शिमला मनाली 30,000/- ६ दिवस
शिमला मनाली 30,000/- ६ दिवस
सिक्कीम दार्जिलिंग गंगाटोक 62,000/- ७ दिवस
वाराणसी अयोध्या लखौन 60,000/- ८ दिवस
कुर्ग म्हैसूर बेंगलुरू 30,000/- ६ दिवस
हायलाईटस् ऑफ काश्मिर 50,000/- ६ दिवस
आसाम अरूणाचल मेघालय 1,02,000/- १२ दिवस
नैनिताल मसुरी हरिद्वार 40,000/- ६ दिवस
भुतान 75,000/- ९ दिवस
थायलंड 50,000/- ४ दिवस
बँकॉक पटाया फुकेत क्राबी 1,12,000/- ०८ दिवस
सिंगापुर मलेशिया थाय 1,60,000/- १० दिवस
बेस्ट ऑफ दुबई अबुधाबी 1,25,000/- ७ दिवस
स्विस पॅरिस 2,55,000/- ८ दिवस
वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, लालटाकी रोड, अहमदनगर.
प्रसाद श्रीकांत मांढरे 98500 63432 7083709473

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग
9590151515 | 9262515151
VARMORA TILES • BATHWARE
KERAKOLL The GreenBuilding Company
CARYSIL German Engineered
colortile
RAK CERAMICS
India's No. 1 NIRALI BG
TIMEX
ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## कर्माचे समर्पण...

**उद्योग करितो सारे काम - संकल्प सोडुनी ।**
**ज्ञानाने जाळली कर्मे म्हणती त्यास पंडित ।।**

'काम-संकल्प' हा शब्द पहा. माझ्या उद्दिष्टामध्येच आसक्ती व अट्टाहास जर नसतील तर कर्माची फळे समजा इच्छेप्रमाणे आली तरी मी समाधानी होईल पण बेफाम होणार नाही आणि इच्छेप्रमाणे नाही मिळाली तर दुःखी होईन, पण स्वतःला जाळणार, पोळणार नाही. कारण 'ज्ञानाने जाळली कर्मे' म्हणजेच मी कर्माचाही वाहक आहे पण मालक नाही. माझ्या स्वधर्माची अभिव्यक्ती म्हणून मी अंगी घेतलेली जबाबदारी, सर्व शक्तीनिशी पार पाडत आहे. स्तुती अथवा टीकेसाठी नव्हे... हा आत्मस्वीकाराचा एक पैलू...

दुसरा पैलू येतो 'अकर्म' ह्या संकल्पनेमध्ये मी करत असलेल्या कामामध्ये इतका तल्लीन होतो की माझे 'मी'पण विरघळूनच जाते. मग मालकी हक्क तर पुढची गोष्ट... मी कृती पूर्ण झाल्यावर जणू भानावर येतो व म्हणतो, ''ठाऊक नाही कसं झालं.. पण मस्त वाटलं करतांना'' इथे आत्मस्वीकाराला नवा आयाम येतो.

विवेकनिष्ठ मानसशास्त्र सांगते की तुमच्या कृतीच्या, वर्तनाच्या परिणामांवरून स्वतःचे मूल्य ठरवू नका. तुम्ही तुमचा रिझल्ट, आऊटकम, परिणाम ईश्वराला अर्पण करा. समाजाला अर्पण करा. ज्ञानरूपी फळ असेल तर जगाला देऊन टाका. तुम्ही सडेफटिंग रहा अलिप्त...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



(डॉ. आनंद नाडकर्णी)

# भूमिहीन समाजाच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र शासनाने जागा द्यावी अन्यथा जंगल तोडून 'जंगलात राहणार'

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व गावात बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्वे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी. तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कुंडली माळी, मिराबाई माळी, बबनराव गडाख, अण्णासाहेब पवार, राजू आहेर, सुनील भवर, जगन्नाथ गडाख, भाऊसाहेब गडाख, संतोष बडे, बबन बडे, शोभा बडे, अर्जुन माळी, किसन माळी, नंदा माळी, भारतीय मोरे, विनय गायकवाड, महादेव माळी, लताबाई माळी, राजेंद्र गायकवाड, मंदा गायकवाड आदीसह अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध गावातील पदाधिकारी उपस्थित होते.



भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

पुढे निवेदनात म्हंटले आहे की, आदिवासी भिल्ल समाजाचे अनेक कुटुंबीय असून हे ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणची जागा नावावर नसून ती महाराष्ट्र शासनाची आहे व गावामध्ये शेत जमीन अथवा घर बांधण्यासाठी जागा नावावर नाही. तसेच या लोकांची अत्यंत गरिबीची परिस्थिती असल्याने जागा विकत घेता येत नाही व त्यांच्याकडे कोणतेही साधन नसल्याने अनेक वेळा उपाशी राहावे लागते. त्यामुळे इकडे तिकडे भटकंती करावी लागत असून या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभत भेटत नाही. त्यामुळे जागा नावावर करून देण्याची मागणी करण्यात आली असून आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांचे सर्व करून जागा अथवा गावातील महाराष्ट्र शासनाची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा हे बेघर आदिवासी भिल्ल समाज जंगल तोडून जंगलात राहणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणात परिपूर्ण माहिती देण्याचे आवाहन

नगर - भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याचे आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त, अर्थ व सांख्यिकी व संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी केले आहे.

या पाहणीसाठी राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहेत. पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे. निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती संकलित करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. नमुना तत्त्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खासगी रुग्णालय/दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणांतर्गत कुटुंबाची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि 'मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती' यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे.

माहिती संकलित करणाऱ्या अधिकारी - कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे प्रशिक्षित कर्मचारी फेब्रुवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान निवडलेल्या कुटुंबांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील माहिती संकलित करतील, असेही कळविण्यात आले आहे.



शहरातील तारकपूर बसस्टॅन्ड मधील अनाधिकृत रिक्षा स्टॉप हटविण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) च्यावतीने करण्यात आली आहे.

# केडगाव औद्योगिक वसाहतीत बिंगो जुगार; पोलिसांचा छापा; २२ हजारांचे साहित्य जप्त

नगर - नगर पुणे रोडवर, इंडस्ट्रियल एरिया येथील अर्बन बँकेसमोर, रस्त्याच्या कडेला एका पत्र्याचे शेडमध्ये सुरु असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावर शहर विभागाचे पोलिस उप अधीक्षक अमोल भारती यांच्या विशेष पथकाने छापा टाकून २२ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले. ही कारवाई ५ फेब्रुवारी रोजी केली.

या बाबतची माहिती अशी की पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिस पथकाने नगर पुणे रोडवर, केडगाव इंडस्ट्रियल एरिया येथील अर्बन बँकेसमोर रस्त्याच्या कडेला एका पत्र्याचे शेडमध्ये छापा टाकला. त्या ठिकाणी उभे असलेल्या दोघांसह बिंगों जुगार अड्डा चालक युवराज गणपत सुपेकर (रा.वैष्णव नगर, केडगाव) याला ताब्यात घेतले. सूपेकर हा दोघांसह लोकांना प्रेरित करुन एलसीडी स्क्रिनवर असलेल्या नंबरवर पैसे लावुन बिंगो नावाचा हारजितीचा जुगार खेळवताना व खेळताना मिळून आले. पोलीसांनी सुपेकर यांच्यासह चेतन प्रकाश काळे (वय २७, रा. एकनाथ नगर, केडगाव) चेतन विशाल पवार (वय २२, रा. पवार चाळ, भोसले आखाडा) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून बिंगो जुगाराची साधने व रोख रक्कम, एलसीडी, सीपीयु, माऊस, किबोर्ड, वायफाय मोडेम असा २२ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात पोलीस नाईक हेमंत खंडागळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस उप निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलिस अंमलदार सचिन जाधव, संतोष ओव्हाळ, महेश मगर, सागर द्वारके, हेमंत खंडागळे यांनी केली.

## पोटात विषारी औषध गेल्याने बुऱ्हाणनगर येथील मुलीचा मृत्यू

नगर - पोटात विषारी औषध गेल्याने १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा औषध उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना ५ फेब्रुवारी रोजी खासगी रुग्णालयात घडली. याबाबतची माहिती अशी की नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथील रूपाली योगेश चव्हाण (वय १५) या अल्पवयीन मुलीच्या पोटात विषारी औषध गेल्याने तिला ३१ डिसेंबर रोजी खासगी रुग्णालयात औषधोपचार करीता दाखल केले. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला.

याप्रकरणी डॉ. सुनील जाधव यांनी दिलेल्या अहवालावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार विधाते करीत आहे.

## शंकरराव उर्फ बापूसाहेब पोतदार यांचे निधन

नगर - मूळ अहिल्यानगरचे रहिवासी (हल्ली कोथरुड, पुणे) शंकरराव केशव उर्फ बापूसाहेब पोतदार (वय ८१) यांचे ६ फेब्रुवारी रोजी तीव्र हृदयविकाराच्या धक्क्याने पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर वैकुंठधाम पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



ते संघाचे जुने स्वयंसेवक व पदाधिकारी, अहमदनगर शहर मित्र मंडळ पुणेचे संस्थापक अध्यक्ष, आणि बापुज् सर्व्हिसेसचे संस्थापक होते.

त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातू, एक भाऊ, भावजय असा परिवार आहे. अहमदनगर ब्राह्मण सेवा संघाचे राजाभाऊ पोतदार यांचे ते थोरले बंधू होत.

# हद्दपार असलेला सलमान खान पुन्हा अहिल्यानगरमध्ये आढळला

## पोलिसांनी कोठला परिसरातून घेतले ताब्यात, गुन्हा केला दाखल

नगर - नगर जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता हद्दपार करण्यात आलेला सलमान मेहबूब खान (वय ३०, रा.कोठला, घास गल्ली, अ.नगर) हा हद्दपारी आदेशाचा भंग करून शहरात वास्तव्य करताना आढळून आल्याने तोफखाना पोलिसांनी त्यास पकडले आहे. मंगलगेट परिसरात कोठला येथे ५ फेब्रुवारीला ही कारवाई करण्यात आली आहे. त्याला या पूर्वीही १५ जुलै २०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने पकडले होते.

या बाबतची माहिती अशी की आरोपी सलमान महेबूब खान याला प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी ३० एप्रिल २०२४ च्या आदेशानुसार नगर जिल्ह्यातून २ वर्षांकरिता हद्दपार केले होते. तरीही तो या आदेशाचा भंग करून नगर मध्ये आला असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली. त्या माहितीवरून पोलिस कोठला स्टॅण्ड येथील कुरेशी हॉटेल जवळील बापू शहा दर्गाजवळ गेले. तेथे एक इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारले असता त्याने सलमान मेहबुब खान असे असल्याचे सांगितले. त्याबाबत खात्री झाल्याने पोलिसानी त्यास ताब्यात घेतले.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी पोलिस कॉन्स्टेबल सतिष त्रिभुवन यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलमान खान याच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलिस अंमलदार डी. बी. जपे, इनामदार, वसिम खान पठाण यांनी केली.

आरोपी सलमान खान याची हद्दपारी आदेशाचा भंग करण्याची ही दुसरी वेळ आहे. त्याला या पूर्वीही १५ जुलै २०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने पकडले होते.



अमेरिका येथील साऊथ वेस्टन अमेरिका युनिव्हर्सिटी यांच्यातर्फे दिले जाणारे डॉक्टरेट ही पदवी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता विजयकुमार ठुबे यांना नुकतीच चेन्नई येथे प्रदान करण्यात आली.

## इंजिनीयर विजयकुमार ठुबे यांना डॉक्टररेट पदवी प्रदान

नगर - महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात स्थापत्य अभियंता म्हणून ३६ वर्ष दिलेल्या योगदानाबद्दल आणि सामाजिक कामाबद्दल अमेरिका येथील साऊथ वेस्टन अमेरिका युनिव्हर्सिटी यांच्यातर्फे दिले जाणारे डॉक्टरेट ही पदवी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता विजयकुमार ठुबे यांना नुकतीच चेन्नई येथे प्रदान करण्यात आली.

इंजिनीयर विजयकुमार ठुबे हे अहमदनगर जिल्ह्यातील मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष असून सध्या ते अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन आहेत

# बंद घराचे कुलूप तोडून सोन्याच्या दागिन्यांची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - बंद घराच्या दरवाजाचे कडी कोयंडा कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत आतील सामनाची उचकापाचक करून घरातील कपाटातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना नगर तालुक्यातील वडगाव तांदळी येथे ५ फेब्रुवारीला पहाटे घडली.

याबाबतची माहिती अशी की दशरथ बबन खुडे (वय ३८, रा. वडगाव तांदळी, ता. नगर) यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कडीकोयंडा कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील एक तोळा वजनाची बोरमाळ, एक तोळा वजनाचे मंगळसूत्र, ५ ग्रॅम वजनाचे कानातील दागिने, एक ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, असा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी दशरथ खुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.

अधिक तपास पोलीस हवालदार सचिन वनवे करीत आहे.

## रामसहाय मेहेरवाल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील व्यापारी राम सहाय नंदलाल मेहेरवाल (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात कार्तिक प्लॅस्टिकचे संचालक निलेश मेहेरवाल व माळीवाड्यातील व्यापारी हनुमान मेहेरवाल ही २ मुले, सुना, पत्नी, ४ विवाहीत मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सौ. मंगलाबाई जाखोटीया यांचे निधन

नगर - जुने दाणेडबरा येथील रहिवासी सौ. मंगलाबाई जाखोटीया (वय ६६) यांचे ५ फेब्रुवारी रोजी पुणे हॉस्पिटल येथे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. बालकिसन रामदिन जाखोटीया यांच्या त्या पत्नी तर मुकुंद जाखोटीया यांच्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. तसेच उद्योजक शामसुंदर व श्रीगोपाल जाखोटिया यांच्या त्या भावजाई होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर दक्षिण मतदार संघातील 'महावितरण'च्या कामांना मिळेना गती

## खा. निलेश लंके यांनी वेधले केंद्रीय स्थायी उर्जा समिती सदस्यांचे लक्ष

नगर - महावितरणअंतर्गत असलेल्या केंद्र सरकारच्या आर. डी. एस. एस. योजनेअंतर्गत सुरू असलेल्या योजनांना गती द्या अन्यथा सबंधित ठेकदारास ब्लॅक लिस्ट करा, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय स्थायी उर्जा समितीच्या बैठकीत केली.

केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभुमीवर खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये उर्जा क्षेत्राविषयी नवीन ध्येय धोरणे ठरविण्या संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यावेळी खासदार निलेश लंके यांनी समितीचे सदस्य या नात्याने नगर दक्षिण मतदार संघातील महावितरणच्या विविध विषयांवर समितीचे लक्ष वेधले.

यावेळी बोलताना खासदार लंके यांनी सांगितले की, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील केंद्र सरकारच्या आर.डी. एस.एस.योजनेअंतर्गत १८६ फिडरचे काम सुरू असून ही योजना केंद्र सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेचा भाग आहे. वीज वितरण कंपन्यांच्या कार्यक्षमता आणि आर्थिक स्थैर्य सुधारण्याचा त्यामागे उद्देश आहे. नुकसान कमी करणे, पायाभुत सुविधा अद्यायवत करणे, विश्वासार्ह वीज पुरवठा सुनिश्चित करणे यावर या योजनेत भर देण्यात आलेला आहे. तसेच त्यात एच.टी. व एल. टी.लाईन विस्तारीत करणे, पोल उभारणे, नवे ट्रान्सफॉर्मर बसविणे व त्याअनुषंगाने सध्या कामे सुरू असून ही कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने खा. लंके यांनी यावेळी स्पष्ट केले.



उर्जा क्षेत्राविषयी नवीन ध्येय धोरणे ठरविण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांविषयी लक्ष वेधताना खा.निलेश लंके

### दोन वर्षात १० टक्केही काम नाही

केंद्र शासनाची ही योजना एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली असून सरकारच्या आरडीडीएसएस योजनेतून नगर जिल्हयात ३ हजार ३७४ कोटी रूपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये वीज वितरणाच्या पायाभूत सुधारणा, स्मार्ट मिटरींग आणि इतर संबंधित उपक्रमांचा समावेश आहे. ही कामे केवळ १८ महिन्यांच्या आत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. दोन वर्षात १० टक्केही काम पुर्ण झालेले नाही असे खा. लंके यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

### एजन्सीला काळया यादीत टाका

या योजनेअंतर्गत राबविण्यामत येत असलेल्या कामांसंदर्भात आढावा घेण्यासाठी महावितरणच्या अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात तीनदा बैठका घेण्यात आल्या. आर.डी.एस.एस.या योजनेसाठी केंद्र सरकारमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आला असून ही कामे वेळेत पुर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. ही कामे वितरीत करण्यात आलेल्या एन.सी. सी. इन्फ्रास्टक्चर या कंपनीकडून अतिशय संथ गतीने सुरू आहे. महावितरणकडून समज देण्यात येऊनही कामे पुर्ण होत नसल्याबद्दल खा. लंके यांनी यावेळी नाराजी व्यक्त करताना या एजन्सीला काळया यादीत टाकण्याची मागणी केली.

### सब स्टेशनची कामे दर्जेदार हवीत

केंद्रीय निधीअंतर्गत कर्जत तालुक्यातील राजापुर, एरंडोली, पारनेर तालुक्यातील भाळवणी, पळवे तसेच नगर शहरातील सारसनगर, सावेडी या ठिकाणी सब स्टेशनर प्रस्तावित असून ही कामे लवकरात लवकर सुरू करावीत व ती वेळेत, गुणवत्तापुर्ण व दर्जेदार असावीत अशी मागणीही खा.लंके यांनी केली.

# गृहिणी

## आरोग्य

### हळद + लिंबू = आरोग्य

हळद आणि लिंबू पाणी हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त नैसर्गिक औषधे आहेत. हळद तिच्या अँटीसेप्टिक आणि दाहक-विरोधी गुणधर्मांसाठी ओळखली जाते, तर लिंबू व्हिटॅमिन सीचा समृद्ध स्रोत आहे. जेव्हा हे दोन्ही एकत्र सेवन केले जाते तेव्हा ते शरीरासाठी अनेक प्रकारे फायदेशीर असते. याने त्वचा उजळते.

## पाककला

### कारल्याचे लोणचे

**साहित्य** - ५०० ग्रॅम कारले, अर्धा कप मोहरीचे तेल, चार चमचे पिवळी मोहरी, दोन चमचे जिरे, दोन चमचे मेथीचे दाणे, १/४ टीस्पून हिंग, एक टीस्पून ओवा, तीन चमचे मीठ, एक चमचा हळद, अर्धा टीस्पून तिखट, १/४ टीस्पून गरम मसाला, अर्धा टीस्पून बडीशेप पूड, १/४ टीस्पून काळे मिरे

**कृती-** सर्वात आधी कारले धुवून स्वच्छ करून घ्यावे. आवडीनुसार कारल्याचे लांब किंवा लहान तुकडे करा. एका पॅनमध्ये मोहरीचे तेल गरम करावे. त्यामध्ये मोहरी, जिरे, मेथी आणि हिंग घालून परतून घ्या. आता हळद, लाल तिखट, गरम मसाला आणि बडीशेप पावडर घालून परतून घ्या. कढईत चिरलेले कारले घालावे. आता मीठ घालावे. तसेच शिजवून घ्यावे. कारले मऊ झाल्यानंतर पाच मिनिटांनी गॅस बंद करावा. थंड झाल्यावर त्यात काळे मीठ घालावे. नंतर लोणचे स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या बरणीत भरावे आणि झाकण घट्ट बंद करावे.

## वास्तू

### शाळेची कर्मचारी व्यवस्था

* कर्मचारी निवास व्यवस्था आग्नेय दिशेत असावी.
* जिमखाना व इतर मनोरंजन सुविधा वायव्य किंवा शक्य नसल्यास ईशान्य भागातसुद्धा चालतात.
* कँटिन आग्नेय दिशेत असणे योग्य असते.

## सल्ला

रोज गव्हाची चपाती खावी यामुळे तुमचे पोट नेहमी मजबूत राहते.

## सौंदर्य

त्वचेची हरवलेली चमक परत आणण्यासाठी, पायांच्या कडक त्वचेला प्युमिस स्टोनने घासून घ्या. प्युमिक स्टोन एक्सफोलिएट करण्याचे काम करतो.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी २०२५

**--- शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, रोहिणी १८।४०, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. २७ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील.

**वृषभ** : व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल.

**मिथुन** : आरोग्य उत्तम राहील. काही काळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस.

**कर्क** : मान-सन्मानात वाढ होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल.

**सिंह** : न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे.

**कन्या** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे. आपल्या करीयरमधील ध्येयपूर्ती कराल.

**तूळ** : आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृश्चिक** : आपल्या क्रोधावर संयम ठेवाल आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळाल. आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील.

**धनु** : अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर** : शत्रू वर्गावर वर्चस्व गाजवाल. आपली योजना सफल होईल. दिवस संमिश्र जाईल. जोडीदाराशी वादविवाद टाळा.

**कुंभ** : आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल.

**मीन** : धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. मागील उधारी वसुल होईल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### नाव

रात्री उशिरा घरी आलेल्या नवऱ्याला बायकोने दमदाटी सुरू करण्याअगोदर हे पतीराज म्हणाले, ''माझ्यावर रागावू नकोस. माझा एक मित्र आजारी असल्यामुळे मी उशिरापर्यंत त्याच्या जवळ बसून होतो.''


बायको म्हणाली, ''तुमच्या या मित्राचे नाव काय?'' काही काळ विचार करून हे पतीराज म्हणाले, ''माझा मित्र इतका आजारी होता की तो त्याचे नाव सांगू शकला नाही.''

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांस्कृतिक संस्थेने मानवतेच्या अमूल्य सांस्कृतिक वारशाच्या प्रातिनिधीक यादीत कशाचा समावेश करण्यात आला आहे? - दुर्गापूजा (पं.बंगला)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११७५ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) संजीवकुमार, जया भादुरी; डेव्हीड यांचा एक चित्रपट ५) राम ++++ (चित्रपटाचे नाव) ६) राज कपूर, वैजयंतीमाला, उषा किरण यांचा एक चित्रपट ८) ++ की सौगंध (चित्रपटाचे नाव) १०) जितेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा (चित्रपटाचे नाव) ११) हम से है +++ (चित्रपटाचे नाव) १३) ++ और रंक (चित्रपटाचे नाव) १५) ++ का पंछी (चित्रपटाचे नाव) १६) मेरे ++ की गंगा और तेरे (गाणे)

**उभे शब्द :-** १) गोविंदा, मंदाकिनी यांचा एक चित्रपट २) सैफ अली खान, ट्विंकल खन्ना यांचा एक चित्रपट ३) अमिताभ बच्चन, हेमामालिनी, ऋषी कपूर, प्राण यांचा एक चित्रपट ४) दादा कोंडके, उषा चव्हाण, अशोक सराफ, रत्नमाला यांचा एक गाजलेला मराठी चित्रपट ७) धर्मेंद्र यांच्या या चित्रपटासाठी गायलेले मोहंमद रफी यांचे शेवटचे गाणे ठरले ९) राजेश खन्नाचा प्रारंभीच्या काळातील एक चित्रपट १२) ++ मेमसाब (चित्रपटाचे नाव) १४) एक ++ है हम (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : गर्वामुळे ज्ञानाचा, स्तुतीमुळे बुद्धीचा आणि स्वार्थामुळे प्रतिष्ठेचा नाश होतो.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## आपण रात्री योगा करू शकतो का?

अनेकांना हे जाणून घ्यायचे असते की रात्री योगा किंवा योगाभ्यास करता येतो की नाही? बरेच लोक म्हणतात की जर पोट रिकामे असेल तर रात्री देखील योगाभ्यास करता येतो. पण ते योग्य आहे का? दिवसा जेवण केल्यानंतर, रात्रीही पोट रिकामे असते का? रात्री योगा करावा की नाही ते जाणून घेऊया.

आयुर्वेदात असे म्हटले आहे की सूर्यास्तानंतर अन्न खाऊ नये. आपला जठरासंबंधी अग्नि दिवसा सक्रिय राहतो आणि रात्री झोपतो. त्याचप्रमाणे, रात्री आपल्या शरीराचे सर्व अवयव आरामशीर होतात आणि त्या सर्वांना विश्रांती हवी असते. योगाचार्य म्हणतात की जर योगाभ्यास किंवा योग तुमच्या जीवनात आचार म्हणून समाविष्ट असेल किंवा तुम्ही योगी असाल तर तुम्ही कधीही योग करू शकता, परंतु जर तुम्ही आरोग्य राखण्यासाठी किंवा तंदुरुस्तीसाठी योग करत असाल तर तुम्ही ते करू नये. रात्री योगा करण्यात काही नुकसान नाही पण तुमच्या शरीराची स्थिती काय आहे ते पहावे लागेल? तुम्ही कोणत्या प्रकारचे अन्न खाता? जर तुम्ही दिवसा योगा केला असेल तर रात्री करण्याची गरज नाही. मुळात, योगाभ्यास करण्यासाठी तुमचे पोट रिकामे असले पाहिजे, दुसरी गोष्ट म्हणजे त्या काळात भरपूर ऑक्सिजन असावा आणि तिसरी गोष्ट म्हणजे त्या वेळी प्रदूषित वातावरण नसावे. जर तुम्हाला पोटाची चरबी कमी करायची असेल तर कुंभकासन नक्की करा.

जेवणानंतर ३ तासांनीच तुम्ही योगा करू शकता, पण हे शक्य नाही, म्हणूनच असे म्हटले जाते की रात्री तुम्ही फक्त ध्यान आणि प्राणायाम करू शकता, योगासन आणि योगाभ्यास नाही. जर तुम्ही संध्याकाळी ६ च्या सुमारास जेवण केले तर तुम्ही रात्री ९ वाजता योगा करू शकता. सकाळी योगासने केली जातात कारण त्या वेळी ऑक्सिजन मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो. रात्री काही योगासनांचा सराव करणे चांगले असू शकते जे तुम्हाला ऊर्जा आणि शांती देतात. परंतु बहुतेक योग शिक्षकांचा असा विश्वास आहे की योगासने किंवा योगाभ्यास रात्री करू नयेत.

## मातृ-पितृ सेवा


ही कथा त्रेता युगातील आहे. ज्यावेळी श्रावण बाळ नावाचा एक तरुण होता. त्याचे त्याच्या आई-वडिलांवर खूप प्रेम होते. पण त्याचे आई आणि वडील हे दोघेही आंधळे होते. त्यांना दृष्टी न्हवती पण त्यांनी मोठ्या कष्टाने श्रावण बाळ याला लहानाचे मोठे केले होते. श्रावणबाळ लहानपणापासूनच आपल्या आईवडिलांचा खूप आदर करत असे. खूप सेवा करीत असे.

एकदा श्रावण बाळाच्या आई आणि वडिलांनी त्यांच्या मनातील इच्छा श्रावण बाळाजवळ व्यक्त केली ते म्हणाले की, बेटा! आता आम्ही म्हातारे झालो आहोत आणि या जगातून जाण्यापूर्वी आम्हाला तीर्थयात्रेला जायचे आहे. देवाचा आश्रय घेतल्याने आपल्याला शांती मिळेल. आपल्या पालकांचे म्हणणे ऐकल्यानंतर, श्रावण बाळ म्हणाला मी घेऊन जाईल तुम्हाला तीर्थयात्रेला तुमची इच्छा पूर्ण करेल. आता यावर श्रावणबाळ विचार करू लागला की आई-वडिलांना कसे न्यावे तीर्थयात्रेला, कारण त्यांना दिसत नाही. असा विचार करीत असताना त्याला एक कल्पना सुचली. तो लगेच बाहेर गेला आणि तिथून दोन मोठ्या टोपल्या घेऊन आला. त्याने जाड दोरीच्या साहाय्याने त्या दोन्ही टोपल्या एका मजबूत काठीवर टांगून एक मोठी कावड बनवली. मग श्रावणबाळाने एका टोपलीत आईला बसवले आणि दुसऱ्या टोपलीत वडिलांना बसवले. त्यानंतर, श्रावण बाळ कावड खांद्यावर घेऊन तीर्थयात्रेला निघाला. श्रावणबाळ आई-वडिलांना सतत एकामागून एक सर्व पवित्र स्थळांना घेऊन जाऊ लागला.

तसेच एके दिवशी श्रावणबाळ त्याच्या आईवडिलांसोबत अयोध्येजवळ विश्रांतीसाठी थांबला. मग त्याच्या आईने पाणी पिण्याची इच्छा व्यक्त केली. श्रावण बाळाला जवळच एक नदी दिसली. श्रावणबाळ आई-वडिलांना म्हणाला, तुम्ही दोघेही इथेच आराम करा, मी लवकरच तुमच्यासाठी पाणी घेऊन येतो.नदी जवळ पोहोचल्यानंतर, श्रावण बाळाने पाण्याच्या भांड्यात पाणी भरण्यास सुरुवात केली. अयोध्येचा राजा दशरथही शिकारीसाठी त्याच जंगलात आला होता. व शिकारीची वाट पाहत झाडावर बसला होता.

पाण्यात हालचालीचा आवाज ऐकून राजाला वाटले की कोणीतरी प्राणी पाणी पिण्यासाठी आला आहे. राजाने न पाहता, फक्त आवाज ऐकून बाण सोडला. दुर्दैवाने तो बाण श्रावण बाळाच्या छातीत लागला व श्रावण बाळ विव्हळत खाली कोसळला. एक पुरुषाचा ओरडण्याचा आवाज आला म्हणून राजा लागलीच झाडावरून उतरून नदीजवळ आला. पाहतो तर काय एक तरुणाला बाण लागला होता व तो वेदनेने विव्हळत होता. राजा लगेच श्रवणकुमारजवळ गेला आणि म्हणाला, मी खूप मोठी चूक केली आहे. मला माफ करा. इथे कोणी माणसे असतील याची मला कल्पना नव्हती. या चुकीचा पश्चात्ताप करण्यासाठी मी काय करावे जेणेकरून तुम्ही मला क्षमा कराल?

(क्रमशः)



# रहमते दर्शन (भाग - १)

मैं अपने सतगुरु संत दर्शनसिंह जी महाराज की याद में खोई हुई थी और उस लॉकेट में अपने प्रियतम के दर्शन कर रही थी जो मैंने अपने गले में पहन रखा था। सहसा क्या देखती हूँ कि न जाने किस दरवाज़े से चार डाकू हमारे सामने हाथों में पिस्तौल लेकर आ खड़े हुए। हम सब के चेहरों पर हवाइयाँ उड़ने लगीं। डाकुओं ने आते ही हमें निर्देश दिया कि जो कुछ है, सब हमारे हवाले कर दो, वरना जान से हाथ धोना पड़ेगा। तभी सतगुरु की दया से मेरे मन में एक विचार कौंधा । मैंने महाराज संत दर्शनसिंह जी के उस लॉकेट को, जो मैंने अभी भी अपने हाथों में लिया हुआ था, उसे अपने माता-पिता की ओर बढ़ाते हुए कहा, 'आप इस लॉकेट को चूम लो। मेरे माता-पिता ने ऐसा ही किया। तभी क्या देखती हूँ कि चार सिपाही हाथों में बंदूक लिए वहाँ आकर खड़े हो गये और डाकुओं पर फायर करके उन्हें खदेड़ दिया। इस प्रकार प्यारे सतगुरु दयाल ने हमें मौत के शिकंजे से छुड़ा लिया।

### बिन गुरु मेरा कोई ना सहाई

### महाराज जी द्वारा मेरे पोते की रक्षा

मैं यहाँ एक ऐसी घटना का ज़िक्र करना चाहता हूँ, जिससे पूर्ण गुरु की सँभाल के बारे में पता चलता है। एक बार मेरा पोता, शोभित, जो कि ९ महीने का था, बीमार पड़ गया। उसे गंगाराम अस्पताल में दाखिल करा दिया गया। अनेक प्रकार के उपचार करने पर भी जब कोई आराम नहीं हुआ, तो डॉक्टर ने उस नन्हे से बच्चे का ऑपरेशन करने का निर्णय लिया। जब हमें उनके इस निर्णय का पता चला, तो हम बड़े दुःखी हुए कि क्या करें, क्या न करें? कोई रास्ता सूझ नहीं रहा था। आख़िरकार महाराज जी का ध्यान आया तो आश्रम में जैन साहब से मिले। जैन साहब ने कहा, महाराज जी अभी आराम फरमा रहे हैं और अभी उन्हें जगाना ठीक नहीं है। जब महाराज जी जागे तो एक अन्य कार्यक्रम में व्यस्त हो गये। वहाँ आश्रम में किसी सिलसिले में एक पार्टी हो रही थी।

हमें भी खाने पर बुलाया गया। हमने खाना तो क्या था, हमारा पूरा ध्यान अपने पोते में ही था। वहाँ से फारिग होकर महाराज जी अपने दफ्तर में चले गये और हमें बुला भेजा। हमने अपना पूरा दुःखड़ा महाराज जी के सामने रो दिया। महाराज जी ने कुछ देर तक अन्तर में ध्यान किया, फिर वहाँ लगी हुई महाराज कृपालसिंह जी की फोटो की ओर देखकर बोले, चिंता की कोई आवश्यकता नहीं है, बच्चा अपना ही है। महाराज जी दया करेंगे। मैंने कहा, महाराज जी, डॉक्टर ऑपरेशन

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

व्यवहार को बदलने के लिए विचारों अर्थात मन बदलना होगा मन एक नाजुक परन्तु बहुत कठोर तत्व है। इसे बदलने के दो ही तरीके हैं। मन प्यार से बदलता है या भगवान की याद से बदलता है। भगवान को याद कोई वीर ही करता है। इसलिए लोगों के मन और व्यवहार नहीं बदल रहे हैं। दूसरी विधि प्यार की है जो सभी की समझ में आती है। इस संसार में आज कोई किसी से प्यार नहीं करता। इसलिए हरेक व्यक्ति को अपने आप से प्यार करना है। जब हम अपने आप से प्यार करेगें तो स्वयं के विचार बदलेगें। जब हमारे विचार बदलेगें तो हमारे बोल बदलेगें। जब बोल बदलेगें तो हमारा व्यवहार बदलेगा। जब हमारा व्यवहार बदलेगा तो हम अपने सम्पर्क में आने वाले लोगो को बदलेगें। वह लोग उनके संबंध में आने वाले लोगो को बदलेगें। इस तरह सारा संसार बदल जाएगा। हम अपने से बड़ों को नहीं बदल सकते। हम सिर्फ उन लोगों को बदल सकते हैं जो हमारे से प्यार करते हैं या हमारे से छोटे हैं या हमारे पर निर्भर हैं। इसलिए अगर हम संसार को बदलना चाहते हैं तो सदैव याद रखो कि अमुक परिस्थिति में मेरे बस में क्या है। मेरे बस में यह है कि मै केवल और केवल दूसरों से प्यार कर सकता हूं और किसी को मेरे से प्यार करने के लिए मजबूर नहीं कर सकता। अत: दूसरों से प्यार करने की कला को विकसित करना चाहिये। जन्म से पहले व्यवहार का प्रभाव अभिमन्यु ने चक्रव्यूह में घुसने की कला मां के गर्भ में रहते हुए सीखी थी। खान-पान, स्वाद, आवाज, जबान जैसी चीजें सीखने की बुनियाद हमारे अंदर तभी पड़ गई थी, जब हम मां के पेट में पल रहे थे। इसलिए माताओं को नसीहतें मिलती हैं कि ज्यादा मसालेदार चीजें न खाओ, ये न खाओ, वो न पियो, ऐसा न करो, वैसा न करो वरना अजन्मे बच्चे पर बुरा असर पड़ेगा। माता जो कुछ भी खाती-पीती हैं, उसकी आदत उसके अजन्मे बच्चे को भी पड़ जाती है। गर्भ के दौरान लहसुन खाती तो उसके बच्चे को भी लहसुन खूब पसंद आएगा। जो महिलाएं गाजर खूब खाती थीं तो उनके बच्चों को भी पैदाइश के बाद अगर गाजर मिला बेबी फूड दिया गया, तो वह स्वाद ज्यादा पसंद आया, मतलब ये कि गाजर के स्वाद का चस्का उन्हें मां के पेट से ही लग गया था। पैदा होने के फौरन बाद बच्चे मां का दूध

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### नवजात बालकाची परिचर्या

नवजात बाळ हे प्रथम २ ते ३ महिन्यांमध्ये जास्त झोपत असल्या कारणाने चंचल प्रवृत्ती त्यामध्ये नसते. बाळ तीन महिन्यांचे झाल्यावर हातपाय हलविणे, वर-खाली करणे अशा क्रिया करते. बाळ अंघोळीच्या वेळी देखील हातपाय हलवत असते व या हातपाय देण्याची त्याला मजा वाटते; म्हणून बाळ तोंडाने आवाज देखील काढते. ४-५ महिन्यांचे मान धरू लागते. तसेच पालथेही पडू लागते. त्यावेळी त्याला रंगीत खेळण्यांचे आकर्षण वाटते.

सहा महिन्यांचे बाळ बाहुली, चेंडू, खुळखुळा इत्यादी खेळणी हातात धरायला शिकते. धरल्यानंतर त्या खेळण्याकडे एकटक पाहणे व खेळणी चोखणे आदि क्रिया बालक करते. बाळाच्या हातातून खेळणी घेतली तर बाळ रडायला लागते. एक वर्षाच्या बाळाला आईची साडी, ओढणी यांबरोबर खेळण्यास आनंद वाटतो. जसजसे बाळ वयाने मोठे होते तसतसे त्याची खेळणी व खेळ यांमध्ये विविधता येते.

दीड ते दोन वर्षाची मुलगी बाहुली, प्राणी, पक्षी अशा खेळण्यांबरोबर जास्त खेळते, मुलगा विमान. मोटार गाडी, चेंडू याबरोबर खेळतो. दोन ते तीन वर्षांच्या बाळाला पेन्सिल, पेन, रंगखडू यांचे आकर्षण असते. भिंतीवर, पानावर, फरशीवर रेघोट्या मारणे व परत पुसणे व परत रेघोट्या मारणे त्याला आवडते. वेगवेगळी खेळणी खेळता-खेळता तोडणे, सायकल, गाड्यांची चाके वेगवेगळी करणे हे नुकसानकारक जरी असले, तरी ते बाळाच्या मानसिक व बौद्धिक विकासासाठी महत्त्वाचे असते. खेळता-खेळता वस्तूंची मोडतोड करणे ही एक नैसर्गिकवृत्ती आहे. 'खंडणामधून नवनिर्माण' या सिद्धान्ताद्वारे आपले बाळ पुढील आयुष्यात यातून काहीतरी नवीन वस्तू निर्माण करण्यास शिकेल.

खेळण्यामुळे बाळांचा व्यायाम आपोआप होतो व त्यामुळे त्यांची शारीरिक शक्ती वाढते. ही शक्ती वाढल्याने बाळ अधिक खेळकर होते; म्हणून बाळाच्या विकासामध्ये आहाराइतकेच झोपेला व खेळाला महत्त्व आहे. लहान बालकांना खेळण्यासाठी मोकळ्या हवेमध्ये तसेच बागेमध्ये फिरायला घेऊन जावे.


एकाच ठिकाणी सारखे घरामध्ये बालक कंटाळते. त्याकरिता बालक सात-आठ महिन्यांचे झाल्यावर जेव्हा ते बाहेरच्या वातावरणातील गोष्टींचा आनंद घेऊ लागते. त्या वेळी त्याला बाबागाडीतून फिरायला न्यावे. फिरायला नेल्यावर बालकाला ताजी, मोकळी, स्वच्छ हवा मिळते, नवीन-नवीन दृश्ये बघायला मिळतात व त्यामुळे बालक आनंदी राहते. तसेच बालकाला मोकळ्या हवेत नेल्यामुळे बाहेरच्या वातावरणाची त्याला हळहळू सवय हाते व बाहेरच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी त्याचे शरीर प्रयत्न करू लागते. आरोग्याला हानिकारक अशा धूर, धूळ, डास, माश्या, अतिगोंगाट असलेल्या ठिकाणी बाळाला फिरण्यास धऊन जाऊ नये.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# श्रीरामकृष्ण ट्रस्टद्वारा नगरमध्ये श्री राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीने ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन





नगर – श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टद्वारा अहिल्यानगरमध्ये प्रथमच जोधपूर (राजस्थान) येथील श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या अमृतवाणीने संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान दुपारी ३ ते ६ या वेळेत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉनमध्ये करण्यात आले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी झाली आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार यांनी दिली.

ते म्हणाले, रामचंद्रजी डोंगरे महाराजांच्या प्रेरणेने १९८२ साली श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टची स्थापना करण्यात आली. संत–महंतांचे कार्यक्रम आणि कथा सोहळ्यांचे आयोजन श्री गोविंददेव गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत अखंडपणे ट्रस्टच्या माध्यमातून सुरू आहे. श्री राधाकृष्णजी महाराजांना नगर शहरात २०१२ साली श्रीमद् भागवत कथा सोहळ्यासाठी आणण्याचे कार्य ट्रस्टनेच सर्वप्रथम पार पाडले होते.

भक्त शिरोमणी संत मीराबाईंनी भगवान श्रीकृष्णाची भक्ती समर्पण भावाने कशी करावी? याचा आदर्श भारतीयांसमोर ठेवला. मीराबाईंचे जीवनचरित्र प्रभू भक्ती एवं नारी सशक्तीकरणाचे उत्कृष्ट प्रतीकच आहे. आजच्या संगणकयुगामधील युवतींना प्रेरणा मिळावी म्हणून या खास कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कथा सोहळ्याच्या शिस्तबध्द नियोजनासाठी विविध समित्या निर्माण करण्यात आल्या आहेत.

ट्रस्टचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, खजिनदार मगनलाल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत निर्माण करण्यात आलेल्या समित्या आणि समिती प्रमुख असे मंडप व्यवस्था समिती प्रमुख शरद झंवर, कार्यालय समिती प्रमुख हिरालाल पटेल, प्रचार व प्रसार समिती प्रमुख रामेश्वर बिहाणी, मिलिंद चवंडके, बजरंग दरक, अर्थ समिती प्रमुख राजेंद्र गुजराथी व नितीन मंत्री, पूर्जाअर्चा व धार्मिक अनुष्ठान समिती प्रमुख हर्षल शहा, अतिथी निवास समिती प्रमुख विनोद पटेल व सोमनाथ नजान, भोजन प्रसाद समिती प्रमुख सुरेश चांडक व देवकिसन मणियार, प्रसाद वितरण समिती प्रमुख पुरूषोत्तम नावंदर, जनसंपर्क समिती प्रमुख मधुसूदन सारडा व विजय पंजाबी, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख डॉ.विजय भंडारी, स्टोअर समिती प्रमुख पुरूषोत्तम पटेल, पार्किंग व्यवस्था समिती प्रमुख विशाल पटेल. कार्यक्रम सूत्रसंचलन कु.हर्षा गुजराथी.

भक्त शिरोमणी संत मीराबाईंच्या जीवन चरित्राचे गुणगान श्री राधाकृष्णजी महाराजांच्या अमृतवाणीमधून ऐकण्याची पर्वणी नगरकरांना प्रथमच लाभणार आहे. या कथा सोहळ्याच्या श्रवणाचा आनंद घेण्यासाठी अहिल्यानगर शहरासह उपनगरातील भाविकांनी विशेषतः युवक–युवतींनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'ओ. पी. नय्यर हिटस्'मध्ये सुरांचा सांगाती धनेश बोगावत यांचा अनाहततर्फे सन्मान



'ओ. पी. नय्यर हिटस्' मध्ये सुरांचा सांगाती धनेश बोगावत यांचा अनाहततर्फे सन्मान करताना नानासाहेब जाधव.

नगर – हिंदी चित्रपट सृष्टीतील संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित ओ. पी. नय्यर हिटस् दिल की आवाज भी सुन हा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम नुकताच माऊली सभागृहात झाला. अनाहत एक कलासृष्टी या संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात अहिल्यानगरीचे खऱ्या अर्थाने रसिकराज असलेले कलाकारांना नेहमीच शाबासकीची आणि कौतुकाची थाप देणारे, आपल्या खुमासदार शैलीतून सर्वांच अगदी मनापासून आदरातिथ्य करणारे असे सुरांचा सांगाती धनेश बोगावत यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सन्मानपत्राचे वाचन नाट्य कलावंत अनिकेत देऊळगावकर यांनी केले.

सन्मानपत्राचे शब्दांकन सतीश स. कुलकर्णी यांनी केले होते.



कस्तुरी फाउंडेशनच्या महिलांनी विळद घाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात हळदी–कुंकूचा कार्यक्रम राबविला.

# वृद्धाश्रमातील ज्येष्ठ महिलांसह रंगला हळदी–कुंकूचा कार्यक्रम

## कस्तुरी फाउंडेशनच्या महिलांचा सामाजिक उपक्रम

नगर – वृद्धाश्रमातील ज्येष्ठ महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने कस्तुरी फाउंडेशनच्या महिलांनी विळद घाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात हळदी–कुंकूचा कार्यक्रम राबविला. यावेळी वृद्धाश्रमातील महिलांसह फुगड्या, मनोरंजनात्मक खेळ व उखाणे रंगले होते.

मोठ्या आपुलकीने हळदी–कुंकूसाठी आलेल्या महिला पाहून वृद्धाश्रमातील महिला भारावल्या. वृद्धाश्रमातील महिलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याचा सोहळ्यात महिला सहभागी होत्या. समाजातील घटक म्हणून वृद्धाश्रमातील महिलांसह कस्तुरी फाउंडेशनने हा उपक्रम राबविला. यावेळी सोनम दत्ता गाडळकर, डॉ. सुनिता लोडे, लता शिंगवी, अनुराधा वाघ, स्वाती गाडळकर, आशा झावरे, प्रियंका वालझडे, सारिका शिंदे, नीला मुळे, सविता शिंदे, सोनाली सोनवणे, उषा शेळके, ज्योती घोडके, पूनम दळवी, खांदवे मॅडम, मांडगे, जयश्री मेहेत्रे, प्रगती भोकरे, आशा बोरुडे, पूनम होळकर, आढाव मॅडम, ज्योती मिसाळ, दिपाली लगड, निशा देवडे, राजश्री भोजने, वैशाली पाटील, वैशाली सैंदर, जयश्री ढोबळे, तळवले, शकुंतला आंधळे, पुनम होळकर, मीरा होळकर, पुनम नहार, बांदल मॅडम, रेश्मा शिंदे आदी उपस्थित होत्या.

वृद्धाश्रमातील महिलांना वाण म्हणून गरजेच्या भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ महिलांनी उखाणे घेताना त्यांचे डोळे देखील पाणवले.

# काश्मीरमधील अनाथ मुलींसाठी महाराष्ट्राच्या मैत्रिणींचा अनोखा उपक्रम



काश्मीरमधील संघर्षामुळे अनाथ झालेल्या मुलींच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनमध्ये महाराष्ट्रातील १७ महिलांनी जाऊन मुलींना शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे दिले.

नगर – काश्मीरमधील संघर्षामुळे अनाथ झालेल्या मुलींच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनमध्ये महाराष्ट्रातील १७ महिलांनी जाऊन मुलींना शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे दिले. १० ते २० जानेवारी या काळात झालेल्या या उपक्रमात विविध कौशल्ये शिकवून मुलींना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

फाउंडेशनची स्थापना आधिक कदम यांनी २००२ मध्ये केली, परंतु त्यांचा समाजसेवेचा प्रवास १९९७ मध्येच सुरू झाला. किशोरवयातच त्यांनी काश्मीरमध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे निराधार झालेल्या मुलींना पाहिले आणि त्यांचे जीवन सुधारण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार केला. आज या संस्थेचे ५ होस्टेल्स कार्यरत आहेत – ५ काश्मीरमध्ये (श्रीनगर, बिरवा, कुपवारा, अनंतनाग) आणि १ जम्मू येथे राहणाऱ्या मुलींना शिक्षण, संस्कार, आरोग्यसेवा आणि आर्थिक स्वावलंबनासाठी प्रशिक्षण दिले जाते.

महाराष्ट्रातील महिलांचा सात दिवसांचा उपक्रम– पुणे, ठाणे, डोंबिवली, वाशी, सातारा, अहिल्यानगर येथील १७ महिलांनी एकत्र येऊन काश्मीर आणि जम्मूमधील १०३ मुलींना स्वावलंबन आणि रोजगारक्षम कौशल्ये शिकवण्याचा निर्णय घेतला. कोणत्याही संस्थेला पालकत्वाची जबाबदारी निभावतांना अनंत समस्या येतात, त्यातील एक समस्या म्हणजे मनुष्यबळाचा अभाव. कोणत्याही घरामध्ये एका मुलामागे आई–वडील आणि असतील तर आजी आजोबा असे किमान चार लोक लक्ष देण्यासाठी, संस्कार करण्यासाठी असतात. पण संस्थेमध्ये एवढी माणसे उपलब्ध होऊ शकत नाही. आम्ही मैत्रिणींनी ठरवले आपण वर्षभर कुटुंबाची, मुलांची, नातेवाईकांची जबाबदारी घेतच असतो, त्यातून वेळ काढून आपण या मुलींचे किमान सात दिवसासाठी पालकत्व घेऊया. आम्हा सतरा जणी पैकी बहुतेक जणी व्यवसाय करतात, नोकरी करतात, बऱ्याच जणी वेगवेगळ्या कलांमध्ये निपुण आहेत. मग आम्ही ठरविले आपण अशा गोष्टी मुलींना शिकवू या ज्यामुळे त्या वस्तू तयार करायला शिकल्यानंतर भविष्यामध्ये त्या वस्तूंची विक्री करून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात.

मुलींना शिकवलेल्या गोष्टी : या स्वयंसेविका महिलांनी सकाळी ६.३० ते रात्री ७.३० या वेळेत काम करून मुलींना खालील गोष्टी शिकवल्या: सेल्फ डिफेन्स आणि योगासने, पेपर क्विलिंग, मोत्याचे दागिने आणि लिप्पन आर्ट,

स्वयंपाक – महाराष्ट्रीयन पदार्थांची ओळख, माईंडफुलनेस मेडिटेशन आणि बौद्धिक सत्रे, चारचाकी चालवण्याचे प्राथमिक प्रशिक्षण, वॅक्स पावडर, साबण, परफ्यूम आणि फेशियल बॉम्ब तयार करणे, पुष्पऔषधी आणि आयुर्वेदातील १२ क्षारांचा वापर.

मुली या उपक्रमात अतिशय आनंदाने सहभागी झाल्या. त्यांना नवीन कौशल्ये शिकताना आत्मविश्वास मिळाला.

अहिल्यानगरमधून सहभागी झालेल्या जयश्री सोमाणी, अनुराधा बिहाणी व दीपिका भारदे यांनी मोत्याच्या वस्तू, सूर्यनमस्कार, लिपन आर्ट शिकविले. नीता म्हस्के व गीता देशमुख यांनी इन्स्टंट रांगोळी, पेपर क्विलिंग व महाराष्ट्रीयन पदार्थ शिकविले. पद्मजा धोपावकर यांनी सेल्फ डिफेन्स, इन्स्टंट रांगोळी, मोत्याचे दागिने शिकविले. डॉक्टर अंशू मुळे यांनी माईंड फुलनेस मेडिटेशन, बौद्धिक सत्र व पेपर क्विलिंग शिकविले. फाउंडेशनने अतिशय उत्कृष्ट व्यवस्थापन केले. जम्मूमधील कडाक्याच्या थंडीतही महिलांना कोणतीही अडचण आली नाही.

या उपक्रमानंतर दरवर्षी ७ दिवस समाजसेवेसाठी द्यायचे असा निर्णय या महिलांनी घेतला आहे. महाराष्ट्रातील नागरिकांनीही अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. माहिती आणि मदतीसाठी www. borderlessworldfoundation.org या वेबसाईटला भेट द्या.

# अतिदुर्गम आदीवासी भागातील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

## आदिवासी सेवा प्रतिष्ठानचा उपक्रम; ग्रामस्थांवर मोफत औषधोपचार




अतिदुर्गम आदीवासी गावात ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करुन मोफत औषधोपचार करण्यात आले.

नगर – सह्याद्रीच्या चारही बाजूने वेढलेले व निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या फोफसंडी (ता. अकोले) येथील अतिदुर्गम आदीवासी गावात नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर राबविण्यात आले. आदीवासी भागातील नागरिकांना अद्यावत आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीकोनाने आदिवासी सेवा प्रतिष्ठानच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून आदीवासी ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करुन मोफत औषधोपचार करण्यात आले.

जिल्ह्यातील अतिदुर्गम आदीवासी भाग असलेल्या फोफसंडी गावात आजही जंगलात वाडी–वस्तीत तर एक कुटुंब चक्क गुहेत राहत आहे. अशा लोकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहचविण्याच्या उद्देशाने आदिवासी सेवा प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन आरोग्य शिबिर राबविले. या शिबिरास परिसरातील ग्रामस्थांचा सहभाग लाभला. याप्रसंगी गावचे सरपंच सुरेश वळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशीनाथ गवारी, सचिव महेश शेळके, उपाध्यक्ष नितीन साबळे, हेमंत घोडे, आदिनाथ भांगरे, ऋषी उघडे, जेष्ठ सदस्य नवनाथ बांबेरे, उबाळे, शिवाजी वळे, तान्हाजी वळे आदी उपस्थित होते.

महेश शेळके म्हणाले की, आदिवासी समाज आजही शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित आहे. आरोग्य सुविधा परवडत नसल्याने पारंपारिक पध्दतीने ते औषधोपचार करतात. मात्र गंभीर आजार टाळण्यासाठी वेळोवेळी उपचार व तपासण्यांची गरज आहे. ही जाणीव ठेवून सदर शिबिर राबविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काशीनाथ गवारी म्हणाले की, सकल आदिवासी समाज हा शिक्षण, रोजगार तसेच आरोग्य या मुलभूत सोयी–सुविधांपासून सातत्याने उपेक्षित आणि वंचित राहिला आहे. या सुविधा त्यांच्या दारा पर्यंत घेऊन जाव्या लागणार आहे. त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सरपंच सुरेश वळे यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या कार्याचे कौतुक करुन आभार मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी तज्ञ डॉक्टरांनी आदिवासी ग्रामस्थांची विविध आरोग्य तपासणी करुन गरजूंना मोफत औषधे दिली. तर निरोगी आरोग्याबद्दल मार्गदर्शन केले. हेमंत घोडे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरचे एन. एन. सथ्था कॉलेज आणि इंडोनेशियाच्या इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार



नगर – शहरातील आनंदधाम व बँक ऑफ इंडिया समोरील एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी अहिल्यानगर आणि इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजी सुमतेरा (ITERA) या इंडोनेशिया मधील विश्वविद्यालय यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याची माहिती कॉलेजचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे यांनी दिली.

या कराराद्वारे दोन्ही संस्थांमध्ये शैक्षणिक, वैज्ञानिक आणि संशोधन क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत. कराराच्या अंतर्गत विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची शैक्षणिक व संशोधन देवाणघेवाणसाठी संधी उपलब्ध होईल तसेच दोन्ही संस्थानांना त्यांच्या संशोधन प्रकल्पांना सहकार्य करण्याचा आणि नवे संशोधन क्षेत्र शोधण्याचा एक मंच प्राप्त होईल असे यावेळी नमूद करण्यात आले.

या करारामुळे भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शिक्षणाच्या आणि संशोधनाचा क्षेत्रातील नवीन दृष्टिकोनाचा लाभ होणार आहे. सदर समंजस्य करारानुसार दोन्ही संस्थांना खालील लाभ होणार आहे,

–संयुक्त संशोधन सहकार्य., संयुक्त कार्यक्रम परिषद कार्यशाळा आणि परिसंवाद., व्यावहारिक प्रशिक्षण आणि एकात्मिक ज्ञानाचा कार्यक्रम., अध्यापन कर्मचाऱ्यांची देवाणघेवाण., पदवीपूर्व विद्यार्थ्यांची देवाणघेवाण., संशोधन निधी उभारण्यासाठी सहकार्य.

या करारामुळे विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांना संशोधन क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करण्याची मौलिक संधी प्राप्त झालेली आहे. या सामंजस्य करारासाठी संस्थेची सचिव ॲड. विद्याधर काकडे, विश्वस्त हर्षदाताई काकडे, पृथ्वीसिंह काकडे, भाग्यश्री काकडे–पाटील व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण बिटाळ यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.विशाल पांडे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांचे हे फलित आहे.



अहिल्यानगर जिल्हा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी डॉ. अमोल फडके यांची निवड केली आहे. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी डॉ. फडके यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. संगमनेर येथे झालेल्या कार्यक्रमात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते त्यांना अधिकृत निवडपत्र प्रदान करण्यात आले.

# आर्किटेक्टचर अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश परीक्षेची (नाटा) नोंदणी सुरु

नगर – कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचर नवी दिल्लीच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेची नावनोंदणी सुरु झाल्याची माहिती रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर, वाळूंजचे विश्वस्त सी ए रमेश फिरोदिया यांनी दिली.

यामध्ये पुढील काही गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्याव्यात अशा १.नाटा २०२४ प्रवेश परीक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले ते यावर्षी प्रवेशास पात्र असतील. २. नाटा ची परीक्षा विद्यार्थी ३ वेळा देऊ शकतात. नाटा २०२४ परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांसाठी काही बदल केलेले आहेत. ३. प्रवेश परीक्षा ही मार्च ते जून २०२५ या कालावधीत महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी व शनिवारी घेतली जाईल. ४. विद्यार्थ्याने बारावी (१०+२) भौतिकशास्त्र, गणित या विषयासह उत्तीर्ण झालेला असावा किंवा डिप्लोमा (१०+३) गणित विषयासह उत्तीर्ण झालेला असावा.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर, वाळूंज यांच्यावतीने मार्गदर्शन वर्ग घेतले जाणार आहेत. इच्छुकांनी प्रा. मनोज कापरे (९५१८३३८२०२) व भूषण घुगरकर (८६०५०५३०२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे सल्लागार विश्वस्त डॉ. शरद कोलते यांनी केले आहे.

# शहरात पार पडली सर्व धर्म प्रार्थना

## युवान व घर घर लंगर सेवेचा राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरातील उपक्रम; विविध राज्यातून आलेल्या युवक युवतींनी घडविले एकसंघ भारताचे दर्शन




राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरातंर्गत शहरात धार्मिक, सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी सर्व धर्मिय धर्मगुरुंच्या उपस्थितीमध्ये सर्व धर्म प्रार्थना घेण्यात आली.

नगर – युवान व गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवेच्या वतीने राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिरातंर्गत शहरात धार्मिक, सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी सर्व धर्मिय धर्मगुरुंच्या उपस्थितीमध्ये सर्व धर्म प्रार्थना घेण्यात आली. सावेडी येथील माऊली संकुलात झालेल्या कार्यक्रमात विविध राज्यातून शिबिरात सहभागी झालेल्या युवक–युवतींनी त्यांच्या संस्कृतीचे सादरीकरण करुन एकसंघ भारताचे दर्शन घडविले. यावेळी १७ राज्यातील संस्कृतीवर आधारित नृत्याचे सादरीकरण करण्यात आले.

प्रारंभी बाबाजी गुरभेजसिंग, बाबाजी समर्थ सिंह, पास्टर प्रेमानंद मकासरे, मुन्ना पंडित, मौलाना यांनी त्यांच्या धर्माची प्रार्थना करुन धार्मिक एकात्मतेचा संदेश दिला. सर्व धर्म गुरुंच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी राकेश गुप्ता, डॉ. अमित बडवे, सुफी गायक पवन नाईक, चंबळच्या घाटीत समर्पण केलेले डाकू बहादूरसिंग, मन्सूर शेख, हरजितसिंग वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, मुन्ना जग्गी, किशोर मुनोत, सुनील थोरात, राजा नारंग, जतीन आहुजा, राहुल बजाज, राजू जग्गी, कैलास नवलानी, डॉ. खन्ना, हरीश हरवानी, सिमरन वधवा, अमरजीतसिंग वधवा, भरत बागरेचा, दलजीतसिंग वधवा, कन्हैय्या बालानी, राजेश कुकरेजा, अनिश आहुजा आदी उपस्थित होते.

शहरात राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक युवा शिबिर सुरु असून, या शिबिरात २७ राज्यांतील सुमारे ४०० युवक–युवती सहभागी झालेल्या आहेत. सात दिवस चालणाऱ्या शिबिरामध्ये नगर शहरांमध्ये विविध सांस्कृतिक आणि देशभक्तीवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सर्व धर्म प्रार्थने आयोजन करण्यात आले होते.

राकेश गुप्ता म्हणाले की, सर्व धर्मिय देशात गुण्यागोविंदाने नांदत आहे, हीच भारताची खरी एकात्मता आहे. या एकात्मतेमध्ये देशाचा विकास आहे. भावी पिढीच्या कल्याणासाठी सर्व धर्माचा आदार करण्याचे संस्कार त्यांच्यात रुजविण्यासाठी हा उपक्रम दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अमित बडवे म्हणाले की, प्रत्येक धर्माचा व्यक्ती हा पहिले भारतीय आहे. भारतामध्ये विविधतेने नटलेल्या अनेक जाती–जमाती असून, त्यांच्या योगदानाने देशाचा विकास साधला गेला आहे. प्रत्येक प्रांताची संस्कृती भाषा वेगळी असली तरी, भारतीय म्हणून सर्व एक असल्याचा सर्वांना अभिमान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हरजीतसिंग वधवा यांनी स्वागत केले. सनी वधवा यांनी पंजाबी समाजाबद्दल, डॉ. संजय असनानी यांनी सिंधी समाजाबद्दल, नरेंद्र बोठे यांनी मराठा समाजाबद्दल, सरोज कटारिया यांनी जैन समाजाबद्दल व सुप्रिया गांधी यांनी गुजराती समाजाबद्दल माहिती दिली. यावेळी युवानचे संदिप कुसळकर, सुरेश मैड, ड. श्याम आसावा, गीतांजली भावे, प्राजक्ता भंडारी, सुप्रिया दासी, सुवालाल (बापू) शिंगवी, रणसिंग परमार, कारायील सुकुमारन, मधुसूदन दास, नरेंद्र वडगावकर, प्रमोद पंतम, देवेंद्रसिंग वधवा, शरद बेरड, अमरजीत वधवा, सतीश गंभीर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सिमरनकौर वधवा व रुपेश पसपुल यांनी केले. आभार अनिश आहुजा यांनी मानले.

# राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षपदी सौ. अलका बलदवा यांची फेरनिवड

### सेक्रेटरीपदी सौ. सविता झंवर तर खजिनदारपदी सौ. उज्ज्वला इंदानी



नगर – येथील ज्यु. राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षपदी सौ. अलका बलदवा यांची फेरनिवड एकमताने करण्यात आली. तर सेक्रेटरीपदी सौ.सविता झंवर यांची आणि खजिनदारपदी सौ. उज्ज्वला इंदानी यांची निवडही एकमताने करण्यात आली.

ज्यु. राजस्थानी बहु मंडळाच्या नूतन कार्यकारिणी निवडीची सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या सभेत मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. ती अशी :– सौ.अंकिता हेडा, सौ.मोनिका गट्टाणी, सौ.खुशबू बिहाणी, सौ.तेजस्विता बलदवा, सौ.ज्योती सोमाणी, सौ. निकिता बाहेती, सौ.पूजा लड्डा, सौ.शितल बिहाणी, सौ.प्रिती झंवर, सौ.अश्विनी सोनी.

अध्यक्षा सौ.अलका बलदवा यांनी मनोगत व्यक्त करताना प्रतिभा धूत, नंदा सोमाणी, पुष्पा मणियार, सरस्वती झंवर, काशीबाई हेडा यांचे मार्गदर्शन आणि गीता गिल्डा व शोभा काबरा यांची खंबीर साथ मिळत राहिल्याने विविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबवले.

राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा शोभा राठी, राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षा शोभा सोनी, सावेडी महिला मंडळाच्या अध्यक्षा स्नेहलता सोमाणी, सावेडी बहु मंडळाच्या अध्यक्षा अनुप्रिती झंवर यांनी सतत प्रोत्साहन देत उत्साह वाढवत ठेवला. माझ्या संकल्पना साकारण्याकरिता सेक्रेटरी जया बिहाणी आणि खजिनदार अर्चना मालू यांनी मोलाची साथ देत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले. महानंदा पॉली प्रॉडक्टच्या अनिता सोनी आणि काबरा क्रिएशनच्या मिनाली काबरा यांनी प्रायोजकत्व देत कार्यक्रमासाठी योगदान दिले. या सर्वांच्या सहकार्याने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम पार पाडता आले. अंगणवाड्या, बाबावाडी, अनामप्रेम, मतीमंद मुलींची शाळा, अरूणोदय गोशाळा अशा विविध स्वयंसेवी संस्थांना गरजेच्या उपयुक्त साहित्यासह रोख स्वरुपात मदती दिल्या. नो डेकोरेशन, गिव्ह डोनेशन या अभिनव संकल्पनेमधून कार्यक्रम राबवले. मंडळातील प्रत्येक महिला सदस्येने कार्यक्रमाचा आनंद लुटल्याने आमचाही उत्साह वाढत राहिला. १६० महिलांचे संघटन करण्याचे कार्य करू शकले. इनरव्हिल क्लब, रोटरी क्लब आणि जिव्हाळा ग्रुपमध्ये मी कार्यरत असल्याने तेथील कार्यक्रम नियोजनाच्या अनुभवाचा फायदा मला येथे झाला, असे अलका बलदवा यांनी सांगताना अध्यक्षपदासाठी फेरनिवड केल्याबद्दल आभार मानले.

यावेळी अर्चना पुंगलिया, रिमा मणियार, अनिता मंत्री, स्नेहा सोनी, वंदना राठी, डॉ.रूची अट्टल, डॉ.पायल धूत, शितल डागा, मोना झंवर, चेतना काबरा, दुर्गा जाजू, सोनल सोमाणी, जया चांडक, शितल काबरा यांच्यासह मंडळाच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.



मुंबई मधील कोर्टयार्ड मॅरियट हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात महिला कुस्तीगीर गीता फोगट यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेच्या बाणेर सेवाकेंद्राला इंडियन स्कूल ॲवॉर्डस्‌ २०२५ प्रदान करण्यात आला. कुस्तीगीर गीता फोगट यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी व १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी महिला कुस्तीगीर हस्ते इंडियन स्कूल ॲवॉर्डस्‌ २०२५ प्रदान करण्यात आला.



लालटाकी, मिसगर चाळ येथील महिलांचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांनी स्वखर्चाने परिसरातील नागरिकांसाठी तीन बोअरवेल उपलब्ध करुन दिल्या. याप्रसंगी परिसरातील महिला व नागरिकांशी संवाद साधताना नगरसेविका जाधव.

# माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांनी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी स्वखर्चाने उपलब्ध केल्या बोअरवेल

नगर – लालटाकी, मिसगर चाळ येथील महिलांचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांनी स्वखर्चाने परिसरातील नागरिकांसाठी तीन बोअरवेल उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कामाचा शुभारंभ अश्विनी जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी फरजाना शेख, तब्बसुम शेख, रईसा शेख, शेरा बाजी, सोनु शेख, मुन्नी शेख, सीमा बाजी, शबनाज शेख, आयेशा खान, आलमआरा पठाण, मुमताज शेख आदी महिला उपस्थित होत्या.

अश्विनी जाधव म्हणाल्या की, प्रभाग क्रमांक १० मधील विविध नागरी प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त करुन प्रभागातील विकास कामे मार्गी लावण्यात आली. कामाचे नियोजन करुन प्रभागातील सर्व मुलभूत प्रश्नांना प्राधान्य देण्यात आले आहे. मिसगर चाळ येथील पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असताना व तांत्रिक अडचणीमुळे पाणी प्रश्न सुटत नसल्याने येथील महिलांच्या डोक्यावरील हंडे कमी करण्यासाठी स्वखर्चाने बोअरवेल उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मिसगर चाळ येथील पाण्याचा प्रश्न गंभीर असताना महिलांना उन्हाळ्यात लांबवरुन डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत होते. महिलांची पाण्यासाठी असलेली भटकंती अश्विनी जाधव यांच्यामुळे थांबणार असल्याचे व्यक्त करुन उपस्थित महिलांनी त्यांचे आभार मानले. जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न सोडविल्याबद्दल त्यांचा महिलांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# कर्करोग आजाराच्या जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांचा संकल्प



जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून बूथ हॉस्पिटल आणि सीएसआरडी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

### बूथ हॉस्पिटल व सीएसआरडी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान

नगर – जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून बूथ हॉस्पिटल आणि सीएसआरडी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंबे व सीएसआरडी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना कर्करोग आजाराविषयी सखोल मार्गदर्शन मिळण्यासाठी सदर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना कर्करोग च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, योग्य आहार, तसेच उपचार पद्धती याबाबत जागरूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वेळी कर्करोग तज्ज्ञ डॉ. तेजश्री जुनागडे आणि आहार तज्ज्ञ शीतल शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंबे यांनी कर्करोग प्रतिबंध आणि उपचारामध्ये जनजागृतीचे महत्त्व विशद केले. त्यांनी या गंभीर आजाराच्या विरोधात लढण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. या व्याख्यानात कर्करोगची प्रारंभिक लक्षणे, कारणे, प्रतिबंधक उपाय, उपचार पद्धती आणि योग्य आहाराचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. तेजश्री जुनागडे यांनी कर्करोगचे विविध प्रकार, त्यांच्या उपचारपद्धती तसेच वेळेवर निदानाचे महत्त्व सांगितले. आहार तज्ज्ञ शीतल शिंदे यांनी आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषणयुक्त आहार कसा कर्करोग प्रतिबंधास मदत करू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले. याशिवाय, एचपीव्ही (HPV) लसीकरणाचे महत्त्व, महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंधासाठी आवश्यक असलेली काळजी आणि तरुणांमध्ये आरोग्य जनजागृती कशी होऊ शकते, याविषयीही चर्चा करण्यात आली. एचपीव्ही ही लस बूथ हॉस्पिटलमध्ये कमी किमतीत उपलब्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमात कर्करोग वर यशस्वीरित्या मात केलेल्या योद्ध्यांचे प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. या अनुभवांमुळे उपस्थितांना कर्करोग विषयी सकारात्मक दृष्टीकोन मिळाला आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होण्याची प्रेरणा मिळाली.

सीएसआरडी महाविद्यालयाचे डॉ. प्रदीप जारे यांनी विद्यार्थ्यांनी येणाऱ्या दिवसात आपल्या कार्यक्षेत्रात कर्करोग आजाराच्या जागृतीसाठी प्रत्यत्न करावे असे आवाहन केले. सीएसआरडीचे डॉ. जेमोन वर्गीस व सॅम्युअल वाघमारे यावेळी उपस्थित होते. त्यांनी सामाजिक स्तरावर कर्करोग विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि ग्रामपातळीवर अधिकाधिक कार्यक्रम राबवण्याची गरज अधोरेखित केली.

या व्याख्यानमालेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी कर्करोग बाबत असलेल्या शंका विचारून तज्ज्ञांकडून सखोल माहिती घेतली. यामुळे त्यांच्यात आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बूथ हॉस्पिटलच्या एचआर प्रमुख मेजर ज्योती कळकुंबे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच, प्रवीण साबळे, सुनीता पारखे, अमोल देशमुख, पीयूष मकासरे, कुणाल कळकुंबे, सचिन शिंदे आणि अमित पठारे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी उपस्थितांनी भविष्यातही कर्करोग विषयी जनजागृती करणारे उपक्रम आयोजित करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, महाविद्यालयीन युवकांनी आरोग्य विषयक चर्चासत्रे आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलची तन-मन-धनाने दिलेली आरोग्यसेवा कौतुकास्पद

### धरमचंद कटारिया यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये छातीविकार व ॲलर्जीसाठी मोफत तपासणी शिबिराचे उद्‌घाटन धरमचंद सचिनकुमार कटारिया व सौ.पुष्पा कटारिया व परिवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

### छातीविकार व ॲलर्जीसाठी शिबिरात ५४ रुग्णांची तपासणी

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये प्रत्येक महिन्याला दोन शिबिरे घेऊन असाध्य आजारांवरील उपचारांसाठी मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. येथे रुग्णांची सेवा मोठ्या प्रमाणात केली जात आहे. हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य, डॉक्टर्स, नर्सेस तसेच सर्व स्टाफ तन-मन-धनाने आरोग्य सेवा देण्याचे कार्य करीत आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन उद्योजक धरमचंद कटारिया (खरवंडी कासारवाला) यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये छातीविकार व ॲलर्जी साठी मोफत तपासणी शिबिराचे उद्‌घाटन धरमचंद सचिनकुमार कटारिया व सौ.पुष्पा कटारिया व परिवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी सचिन कटारिया, सौ.सारिका कटारिया, अशोक सोनीमंडलेचा, अनुजाताई सोनीमंडलेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, बाबुशेठ लोढा, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत, फुफ्फुस विकार तज्ञ डॉ.स्नेहा तिरपुडे आदी उपस्थित होते.

सारिका कटारिया म्हणाल्या, आरोग्यसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. जैन सोशल फेडरेशनने रुग्णासेवेची संधी देऊन कटारिया परिवाराला खारीचा वाटा उचलण्याची संधी दिली आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा ही समाजातल्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचली आहे.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, आचार्य आनंदऋषीजींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अखंड आरोग्य सेवेचा यज्ञ अनेक वर्षापासून सुरू आहे. सचिन कटारिया यांनी प्राधान्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या प्रशासकीय कार्यात मदत केली आहे. तसेच वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सचिन कटारिया यांच्या अथक परिश्रमातून २४ एकरचा प्लॉट उपलब्ध झाला आहे. तसेच कटारिया परिवार हा पूर्वीपासूनच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जोडला गेलेला आहे. जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे कटारिया परिवार सातत्याने सामाजिक कार्यात योगदान देत आहे.

डॉ.स्नेहा तिरपुडे म्हणाले, या शिबीरात फुफ्फुसाचे सर्व आजार, झोपे संबंधीचे सर्व विकार, ॲलर्जी विकार, दमा, वजन कमी होणे, न्युमोनिया, न थांबणारा खोकला, टी बी ही लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ओपीडी सुरू आहे. या शिबिरात ५४ रुग्णांनी लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.



राज्यस्तरीय शूटिंग बॉल क्रीडा स्पर्धेत डि पॉल शाळेने यश मिळविले.


# राज्यस्तरीय स्पर्धेत डि पॉल शाळेचे यश

नगर – १७, १९ वर्ष वयोगट मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शूटिंग बॉल क्रीडा स्पर्धा १ व २ फेब्रुवारी रोजी नंदुरबार येथे झाल्या. त्या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने दुसरा क्रमांक मिळविला व १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने तिसरा क्रमांक मिळविला. स्पर्धेत सहभागी असलेल्या खेळाडूंची नावे सोनटक्के ऋग्वेद, वाडेकर शौर्य, अग्रवाल वेद, तांबोळी आयुष, शिरसाठ सार्थक, उदावंत शिवम, गागरे सोहम, भुजाडे शौर्य, पाळंदे अथर्व, लांगी संचित, पवळे सार्थक, शेख मोहम्मद अबुजर, गाढे कीर्ती, जाधव अवंतिका, तनपुरे श्रद्धा, शेळके पायल, रणसिंग सिद्धी, चौधरी समृद्धी, साळवे ब्लेसी, पंडित मानसी, गाडे समृद्धी, बनकर स्नेहल, इत्यादी खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून संघांना पहिल्या तीन क्रमांकात जागा प्राप्त केली.

त्याबद्दल डि पॉल शाळेचे प्राचार्य फा.सँटो, उपप्राचार्य फा. जेम्स, जिल्हा शूटिंग बॉलचे सचिव शेख जावेद, शिक्षक वृंद, पालक वर्ग, इत्यादींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक सय्यद तसलीम यांचे मार्गदर्शन लाभले.

# खुल्या आंतरराष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत सर्वज्ञा शिंदेला सुवर्णपदक



नगर – दिल्ली येथे १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या खुल्या वाको आंतरराष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील विसापूर येथील कु. सर्वज्ञा अनिल शिंदे हिने महाराष्ट्राकडून खेळताना ३२ किलो खालील वजनगटातून अत्यंत चूरशीच्या लढतीत सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. सर्वज्ञा हिने या वर्षीच्या शालेय राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धे तही सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

तिला पुणे येथील प्रशिक्षक सचिन जरे व सिद कामी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सर्वज्ञा हिचे माजी आमदार राहुल जगताप, किक बॉक्सिंग असोसिएशनचे निलेश शेलार, कुकडीचे माजी संचालक धनंजय शिंदे, शिक्षक संजय शिंदे, तानाजी शिंदे, रमेश शिंदे, सोसायटीचे चेअरमन हरिश्चंद्र शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

# 'सवंगडी ७१'च्या मित्रांचा ५३ वर्षांनी आनंद मेळावा

### हृद्य आठवणींना उजाळा व नव्या उपक्रमांची केली आखणी

नगर – दादा चौधरी विद्यालयाच्या (क्र. २) १९७१ साली एस. एस. सी. उत्तीर्ण विद्यार्थांचा स्नेहमेळावा ' सवंगडी ७१ मेळावा' तब्बल ५३ वर्षांनी झाला. नुकताच सिंग रेसिडेंन्सी हॉटेलमध्ये झालेल्या मेळाव्यामध्ये पुणे, नाशिक व छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर येथील सवंगडी सहभागी झाले होते.

प्रारंभी भारतमाता पूजन, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गाऊन मेळाव्याला प्रारंभ झाला. गतवर्षात दिवंगत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, उद्योजक रतन टाटा, तबला नवाज झाकिर हुसेन, आणि सर्व सवंगडी प्रिय स्व. श्रीराम परभणे यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करण्यात आले. सकाळ व दुपार अश्या दोन सत्रात हा मेळावा झाला.

उपस्थितांमधून भाग्यवान सोडत पध्दतीने मेळावा अध्यक्ष व उद्‌घाटकाची निवड करण्यात आली. यामध्ये सौ. वर्षा परदेशी व रमेश लुंकड यांची अनुक्रमे उदघाटक व अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा सौ. जयश्री बागडे व डॉ. अंबादास ससे यांनी सत्कार केला. सौ. परदेशी व श्री. लुंकड यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सर्व सवंगड्यांनी आपापला परिचय करून दिला.

ग्राहक संरक्षण कायदा, ग्राहक पंचायतीचे कामकाज, अहिल्यानगर शाखेचे योगदान याबद्दल माहिती देण्यासाठी ग्राहक पंचायत, अहिल्यानगर शाखेचे जिल्हा सचिव ॲड.सिद्धार्थ वाघमारे व सह सचिव संजय जोशी यांना निमंत्रित केले होते. त्यांनी ग्राहक संरक्षण कायद्याची व्याप्ती, अंमलबजावणी, जागरुक ग्राहकांचे हक्क-कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी स्थानिक शाखेचे कार्य याबाबत सविस्तर माहिती दिली व आपणही या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन उपस्थितांना केले.



आनंद मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र आलेले 'सवंगडी ७१'चे मित्र.

दुपारच्या सत्रात कृष्णा बागडे, रमेश निलाखे, सौ. बुटाणी यांनी कथा वाचन, डॉ. रमेश रोहिवाल यांनी गीत व रमेश वैद्य यांनी कविता सादर केली. उलट सुलट अंक म्हणणे, एबीसीडी म्हणणे शहरातील नामवंत व्यक्ती कलावंत यांचे वर्णन करणे, ऐतिहासिक घटनांचे वर्णन करणे, यावरील कोडी सोडवणे इत्यादी खेळ घेऊन बागडे यांनी कार्यक्रमाची रंगत वाढविली, सर्व यशस्वी व सहभागींना बक्षीसेही देण्यात आली.

डॉ. रोहिवाल यांची नॅशनल इक्विलिब्रीओ मेरीट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या अध्यक्षपदी सन २०२६ साठी निवड झाली त्याबद्दल सर्व सवंगड्यांच्या वतीने त्यांचा अनिल वाबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या मेळाव्यात डॉ. रोहिवाल, डॉ. अंबादास ससे यांनी व रोहिदास नगरे यांनी त्यांच्या डॉ. चिरंजीव यांच्या कडून वैद्यकीय क्षेत्रातील अडचणी प्रसंगी योग्य तो सल्ला, मार्गदर्शन करण्याचे अभिवचन दिले तसेच ॲड. दत्तात्रय उदावंत यांनी कायदे विषयक अडचणीबाबत मार्गदर्शन करण्यास सहमती दर्शविली.

सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेत, आपल्या गत काळातील अनंत स्मृती जागृत करून पुढील वाटचालीसाठी उर्जा मिळवून आपल्या सवंगड्यांना ही उर्जा देत आनंद लुटला. सवंगडी व अरणगांवच्या अवतार मेहेर बाबा ट्रस्टचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी यांनी नुकतेच दिवंगत मित्र श्रीराम परभणे यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यावेळी त्यांनी काशी काबा एक है । एकही राम रहीम । एकही मैदा पकवान बहूत है,कह गये कबिर ।। हा संत कबीराचा दोहा सांगून आत्मा, परमात्मा, ईश्वर, अल्ला, येशू, पाप पुण्य, नरक स्वर्ग एकच आहे जसं मैदा एकच पण त्यापासून विविध पदार्थ बनवले जातात पदार्थ वेगवेगळे असले तरी त्याचा मूळ पदार्थ म्हणजे मैदा एकच आहे हे आपण विसरून जातो याकडे लक्ष वेधले. सर्व मित्रमंडळी आता वयोवृद्ध आहोत आपण आपलं हे बोनस आयुष्य परमेश्वराची व समाजसेवेसाठी द्यावे असे आवाहन केले.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व सवंगड्यांच्या छातीवर राष्ट्रध्वज लावण्यात आला होता, तसेच कार्यक्रम स्थळी राष्ट्रध्वज व भारतमाता प्रतिमा ठेवून राष्ट्रीय एकात्मतेचे प्रसन्न वातावरण निर्माण करण्यात आले होते. सर्व सवंगड्यांना पॅड व पेन चे वाटप करुन एकमेकांचा परीचय अधिक दृढ करण्याचे आवाहन करण्यात आले.

सर्व सवंगड्यांच्या सक्रिय सहभागाबद्दल कौतुक करून शेवटी वंदेमातरम् या राष्ट्र गीताने मेळाव्याचा समारोप करण्यात आला.



जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिर संयोजकांच्या स्नेहमेळाव्याप्रसंगी भारतमाता पूजन करताना जयदेव सिंग व मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते डॉ.दिलीप वाणी.

# थॅलेसीमिया रोगाच्या प्रतिबंधासाठी जनजागृती करणे हा एकमेव पर्याय

## डॉ. दिलीप वाणी यांचे प्रतिपादन; जनकल्याण रक्तकेंद्राचा शिबीर संयोजक स्नेहमेळावा उत्साहात

नगर – जशा प्रत्येक व्यक्तीच्या हस्तरेषा सारख्या नसतात तसेच प्रत्येक व्यक्तीचे रक्तातील हिमोग्लोबिनही सारखे नसते. जर हिमोग्लोबिन मध्ये संख्यात्मक फरक झाला तर ती व्यक्ती थॅलेसीमिया ग्रस्त होते. हा अनुवंशिक दोष आहे. त्यामुळे थॅलेसीमिया ग्रस्त स्त्री–पुरुषांचे विवाह होणार नाही याची खबरदारी घेतली तर हा रोग वाढणार नाही. ज्याचे हिमोग्लोबिन वाकडे आहे त्यांना जनकल्याण रक्तपेढी पर्यंत आणावे. थॅलेसीमिया रोग बरे करण्याचा एका रुग्णाचा खर्च १६ कोटी रुपये एवढा मोठा आहे. ते प्रत्येक रुग्णाला अशक्यच आहे. त्यामुळे थॅलेसीमिया रोगाच्या प्रतिबंधासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे हा एकमेव पर्याय आहे. यासाठी सामाजिक काम करणाऱ्या प्रत्येकाने व रक्तदान शिबिरांचे आयोजन करणाऱ्या संस्थांनी पुढाकार घेऊन समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन थॅलेसीमियाच्या जनजागृतीसाठी राष्ट्रीय स्तरावर काम करणारे डॉ. दिलीप वाणी यांनी केले.

अहिल्यानगर येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने नगर शहर व जिल्ह्यात वर्षभर रक्तदान शिबिरांचे आयोजन करणाऱ्या शिबीर संयोजक संस्था, युवक मंडळ व ग्रुपच्या सदस्यांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.दिलीप वाणी बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे कॅरीयर मायडिया इंडिया कंपनीचे प्लँट हेड जयदेव सिंग होते. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते भारतमातेच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलनाने स्नेहमेळाव्याचे उद्घाटन झाले. या स्नेहमेळाव्यास जिल्ह्यातून आलेले शिबीर संयोजकांना गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.


जयदेव सिंग म्हणाले, सुपा येथील कॅरियर मायडिया इंडिया या कंपनीच्या सीएसआर फंडातून सेवा कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करत आहे. जनकल्याण रक्तपेढीचे रक्त संकलन व रक्तपुरवठ्याचे नी:पेक्ष कार्य पाहून खूप प्रभावित झालो आहे. या कार्यात नागरिकांनी नित्याने सहभागी होत नियमित रक्तदान करावे, असे आव्हान त्यांनी केले.

प्रास्ताविकात सतीश इंदानी म्हणाले, गेल्या वर्षी जनकल्याण रक्त पिढीने मोठ्या उत्साहात स्थापनेचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. रक्तपेढीच्या या सेवा कार्यात सर्व रक्तदाते, शिबिर संयोजक, रक्तदान शिबिरांचे आयोजन करून समिधा टाकून हा यज्ञ कायम सुरु ठेवत आहेत. नगर मधील ९४६ थॅलेसीमिया ग्रस्त रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणारी जनकल्याण रक्तपेढी एकमेव आहे, असे सांगून गेल्या वर्षभरात झालेल्या २५४ शिबिरांच्या माध्यमातून ९२०३ रक्त पिशव्यांचे संकलन झाले असून त्याद्वारे २१ हजार २८६ रक्तपेशव्यांचे वितरण वर्षभरात केले आहे.

यावेळी जनकल्याण समितीचे चंदन कटारिया, मुकुल पाटगावकर, माजी कार्यवाह दिलीप धनेश्वर, रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, रक्तपेढीचे सहकार्यवाह आदित्य चांदेकर, कोषाध्यक्ष अनिल धोकरीया, रुपेश भंडारी, पंकज यादव, प्रा. भानुदास जगताप उपस्थित होते. डॉ.रुपाली म्हसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, सोनाली खांडरे यांनी सूत्रसंचालन केले. सागर उंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रक्त केंद्राचे डॉ.विलास मढीकर, स्मिता बडवे, शरद बळे, गजेंद्र सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

# 'गंपूच्या गोष्टी' बालकथा संग्रहाला राज्यस्तरीय शब्दगंध बालसाहित्य पुरस्कार जाहीर





नगर – येथील भाऊसाहेब फिरोदिया ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी गौरव विजय भुकन लिखित 'गंपूच्या गोष्टी' बालकथा संग्रहाला शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. लॉकडाऊन काळात मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करत गौरवने सहज लिहिलेल्या गोष्टी पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आल्या आणि बाल वाचकांचा प्रतिसाद चांगला मिळाला. त्यामुळे बालवयात लेखक होण्याचे गौरवचे स्वप्न पूर्ण झाले. ९ फेब्रुवारीला अहिल्यानगर येथे कवयित्री संजिवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या १६ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात गौरवला सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

# दादा चौधरी मराठी शाळा आयोजित आंतरशालेय स्पर्धेचा निकाल जाहीर

नगर – हिंद सेवा मंडळाची, दादा चौधरी मराठी शाळेतर्फे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील बालवर्ग ७३ व इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे सुमारे ७९ शाळेतील १९५० विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धा, श्लोक पाठांतर, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, कथाकथन स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे, गट क्रमांक एक बालवर्ग चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक कु.गांधी राजश्री केतन (अ.ए.सो.पूर्व प्राथमिक वर्ग, नवी पेठ), कुमारी शेख फातिमा सरफराज (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग), द्वितीय क्रमांक–उरण आदित्य अजय (म.ए.सो. पूर्व प्राथमिक वर्ग), चि.हुशारे रुद्र संदीप (समर्थ विद्यामंदिर पूर्व प्राथमिक वर्ग, सावेडी), तृतीय क्रमांक–चि.रंधवे अंश गणेश (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग), कु.सुरसे उन्नती निलेश (अंबिका बालक मंदिर केडगाव), उत्तेजनार्थ कु.जिज्ञासा अमोल पाडळे (अंगणवाडी दिल्लीगेट), चि.औशीकर हर्षवर्धन सागर (अंगणवाडी ३५ स्टेशन रोड), कु.कुमटकर अनिका धनंजय (अंगणवाडी ६२ नालेगाव), कु.रोहोकले शांभवी सोमनाथ (अंगणवाडी ६३), चि.सुकाळकर शिवराज भारत (अंगणवाडी माळीवाडा).

## बाल वर्ग श्लोक पाठांतर स्पर्धा

प्रथम क्रमांक– कुमारी शिर्के अद्विका (ल. भा. पाटील प्राथ. शाळा), चि.शेख आली अयाज (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग) द्वितीय कु.धाडगे पूर्वा (समर्थ विद्यामंदिर सांगळे गल्ली), चि. गायकवाड सम्यक प्रकाश (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग), तृतीय कु.कोल्हे तन्वी सुखदेव (महाराष्ट्र बालक मंदिर), कु.पाठक शरण्या मयूर (पालवी शिशुविहार,पाईपलाईन) उत्तेजनार्थ कु.बेरड अनुराधा सोमनाथ (अ.ए.सो. पूर्व प्राथमिक वर्ग,भिंगार), कु.जायकर हिंदवी शशिकांत (समर्थ विद्यामंदिर, सावेडी) कु.चाटकर शिवांगी आशिष (दातरंगे मळा, बालवाडी), कु.सरगम श्रीतेजा निलेश (अ.ए.सो.चा पूर्व प्राथमिक वर्ग नवीपेठ).

## फॅन्सी ड्रेस स्पर्धा

प्रथम क्रमांक– कु.झोंड समृद्धी सचिन (टायनी टोल्डर, माधवनगर), चि.खरात वचन करण (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग, पटवर्धन चौक), द्वितीय क्रमांक– कु.चाटला तनुश्री पवन (अ.ए.सो.चा प्राथमिक वर्ग नवीपेठ), चि.जाधव आदेश दीपक (समर्थ विद्यामंदिर, सावेडी), तृतीय–चि.खराडे वेद गणेश (ल. भा. पाटील प्राथ. शाळा), कु.शेख आहेरा इम्रान (ज्ञानांकुर बाल अध्यापन वर्ग पटवर्धन चौक), उत्तेजनार्थ–कु. गटणे त्रिशा गौरव (शिशुविहार बालवाडी), कु. माळवदे रुद्रांश रोहित (अ.ए.सो.चा पूर्व प्राथ.वर्ग भिंगार), चि.चांभार सुशांत मल्लेश (अंगणवाडी शिवाजीनगर), कु. धर्माधिकारी राज्वी जयदीप (अंगणवाडी माळीवाडा).

## चित्रकला स्पर्धा गट क्रमांक दोन इयत्ता पहिली व दुसरी

प्रथम क्रमांक कुमारी तारु आर्या नागेश (किशोर संस्कृत संवर्धिनी), चि.जावळे चंद्रनील भीमराज (दादा चौधरी मराठी शाळा) द्वितीय चि.वाघमोडे अभिमन्यू गणपत (ल. भा. पाटील प्राथ.शाळा), कु.मरकड नक्षत्रा अशोक (दादा चौधरी मराठी शाळा), तृतीय कु.ढगे रीया अभिजीत (दादा चौधरी मराठी शाळा), कु.वाघ किशा नानासाहेब (नूतन मराठी प्राथमिक शाळा), उत्तेजनार्थ कु. कराळे राजनंदिनी संतोष (दादा चौधरी मराठी शाळा), कु. दौंड प्रीती गुलाब (हिंद सेवा मंडळाची प्राथ. शाळा), चि.पांडुळे गौरव अंबादास (अंबिका बालक मंदिर, केडगाव)

## कथाकथन स्पर्धा गट क्रमांक दोन इयत्ता पहिली व दु सरी

प्रथम क्रमांक चि.ढाकणे अविनाश प्रदीप (बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला), कु.गाडेकर प्रगती ज्ञानेश्वर (दादा चौधरी मराठी शाळा), द्वितीय क्रमांक– कु.कासार पावनी विशाल (महाराष्ट्र बालक मंदिर), चि. टकले यश अमोल (नवीन मराठी शाळा, भिंगार), तृतीय–चि. गुंजाळ श्रीराज सचिन (ल. भा.पाटील प्राथ. शाळा), चि.ठाणगे वेदांत सागर (दादा चौधरी मराठी शाळा), उत्तेजनार्थ– कु.टेकाळकर समृद्धी सचिन (मनपा शाळा), कु. शेख मायरा शकील (दामोदर विधाते प्राथ.शाळा), कु.गायके अन्वि विनीत (संस्कृती श्रीनिवास कनोरे).

## चित्रकला स्पर्धा गट क्रमांक तीन इयत्ता तिसरी व चौथी प्रथम

प्रथम क्रमांक कु.शिंदे वेदिका अभय (महाराष्ट्र बालक मंदिर), चि.शेख फजल मोहसीन (दादा चौधरी मराठी शाळा), द्वितीय क्रमांक कु.यादव वैष्णवी बाळासाहेब (आनंद विद्यालय), चि.थोरात स्वरूप सतीश (दादा चौधरी मराठी शाळा), तृतीय क्रमांक –चि.लोखंडे सिद्धांत अशोक (समर्थ विद्या मंदिर सांगळे गल्ली), चि.उपकारे प्रसाद सचिन (दादा चौधरी मराठी शाळा), उत्तेजनार्थ चि.वानखडे नयन हुसेन (नूतन मराठी प्राथ. शाळा, यशोदानगर), चि.कोठे हर्षद विक्रम (नवीन मराठी शाळा,भिंगार), कु.धिरडे शौर्य मयुरेश (बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला), कु. शिरसे कीर्ती प्रवीण (ल. भा. पाटील प्राथ.शाळा).

## कथाकथन स्पर्धा गट क्रमांक तीन इयत्ता तिसरी व चौथी

प्रथम क्रमांक कु.बढे ईश्वरी मारुती (दामोदर विधाते प्रा. शाळा), कु.साकला हर्षता ललित (दादा चौधरी मराठी शाळा), द्वितीय क्रमांक कु.कुलकर्णी देवयानी मकरंद (संस्कृती श्रीनिवास कनोरे), कु.शिंदे हिंदवी प्रसाद (बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला), तृतीय क्रमांक चि.येवले स्वराज रणजीत (अंबिका विद्यालय केडगाव), कु.शेख आलीना सलीम (दादा चौधरी मराठी शाळा), उत्तेजनार्थ कांबळे रवी किशोर (हिंद सेवा मंडळाची प्राथ. शाळा), कु.पठारे गौरी संतोष (वि. ल. कुलकर्णी प्राथ. शाळा), कु.दरेकर खुशी महादेव (दादा चौधरी मराठी शाळा) चि.झावरे वरद बाबजी (ल. भा. पाटील प्राथ. शाळा), कु. स्वरा दीपक कराळे (बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला).

वरील सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांनी शिक्षक किंवा पालकांसमवेत पारितोषिक वितरण समारंभासाठी १० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता दादा चौधरी मराठी शाळेच्या प्रांगणात उपस्थित राहावे, असे आवाहन दादा चौधरी मराठी शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी व मुख्याध्यापक सुभाष येवले यांनी केले आहे.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा गडावर पडलेला सुमारे ३५ गोण्या प्लॅस्टिकचा कचरा गोळा केला.

# दोनशे विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा गड केला स्वच्छ, ३५ गोण्या कचरा केला गोळा

## डॉ. विखे मेडिकल कॉलेजचा उपक्रम

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा गडावर पडलेला सुमारे ३५ गोण्या प्लॅस्टिकचा कचरा गोळा केला. या कार्यासाठी जणू त्यांच्यात चढाओढ लागली होती. अतिशय उत्साहात गडाची स्वच्छता मोहीम विद्यार्थ्यांनी राबविली.

ट्रेक कॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. भल्या पहाटेच सर्व विद्यार्थी कॉलेजमधून निघाले. सर्वजण मांजरसुंबा गडाच्या पायथ्याशी पोहोचल्यानंतर लाहोटी यांनी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना मोहिमेविषयी माहिती सांगितली. शारीरिक कसरती केल्यानंतर सर्वजणांना हातमोजे व गोण्या देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या गटाने गड चढतानाच प्लॅस्टिकचा कचरा उचलण्यास सुरुवात केली. गडावर गेल्यानंतर तेथील महालाजवळचा परिसर, तसेच मागील बाजूस असणार्या हौदात पडलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, खाद्य पदार्थांचे रॅपर आदी ३५ गोण्या कचरा गोळा केला. स्वच्छता करताना अनेकांनी सेल्फीही घेतले. त्यानंतर चुलीवरची कॉफी व चटकदार भेळ विद्यार्थ्यांना देण्यात आली. गोळा केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी सर्व ॲपच्या व्हॅनने पूर्ण केली.

ही स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विश्वस्त डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य सचिव डॉ. पी. एम. गायकवाड, वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे, प्रशासकीय अधिकारी डॉ. आर. के. पडळकर, अधिष्ठाता डॉ. सुनील नाथा म्हस्के, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेचर क्लबचे मुख्य समन्वयक प्रसाद निरंजन गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सुपा, पारनेर, बेलवंडी व एमआयडीसी हद्दीत दरोडे घालणाऱ्या टोळीतील २ आरोपी मुद्देमालासह जेरबंद



नगर – सुपा, पारनेर, बेलवंडी व एमआयडीसी पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दरोडे घालणाऱ्या टोळीतील २ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुद्देमालासह जेरबंद केले आहे. सिध्देश सादीश काळे (वय २२, रा.वाळुंज पारगाव, ता. नगर), श्रीहरी हरदास चव्हाण (वय २५, रा.वडगाव गुप्ता, ता.नगर) अशी या आरोपींची नावे असून त्यांनी त्यांच्या इतर साथीदारांसह ६ ठिकाणी दरोडे घातल्याची कबुली दिली आहे.

पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी, पठार वस्ती येथील योगेश खंडू शेरकर यांच्या राहत्या घरी २५ जानेवारीला पहाटे अज्ञात आरोपीतांनी प्रवेश करून, फिर्यादी व त्यांचे आईस मारहाण केली. घरातील सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोटार सायकल जबरीने चोरून नेली.याबाबत पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यासह इतर गुन्ह्यांचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना दिले होते, त्यानुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील स.पो.नि.थोरात व पोलीस अंमलदार फुरकान शेख, रविंद्र घुंगासे, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, आकाश काळे, अमोल कोतकर, मेघराज कोल्हे व महादेव भांड यांचे पथक नेमून कारवाईसाठी पाठविले होते.

सदर पथक ५ फेब्रुवारीला तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पारनेर पोलीस स्टेशन हद्दीत आरोपीचा शोध घेत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा केलेले आरोपी हे टीव्हीएस व डीलक्स मोटार सायकलवर कान्हुर रोडने पारनेच्या दिशेने येत आहे. ही माहिती मिळताच पथकाने पारनेर ते कान्हुर पठार रोडवर सापळा लावून संशयीत वाहनावरील सिध्देश सादीश काळे व श्रीहरी हरदास चव्हाण यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीच्या टीव्हीएस कंपनीची मोटार सायकल व एचएफ डीलक्स कंपनीची मोटार सायकल जप्त केल्या. पथकाने ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीकडे गुन्हयांचे अनुषंगाने विचारपुस केली असता दिलेल्या माहितीवरून पारनेर, भिंगार कॅम्प, सुपा, बेलवंडी व एमआयडीसी पोलीस स्टेशनला दाखल गुन्हयांची पडताळणी करून ६ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. ताब्यातील इसमांना गुन्हयांतील सोन्याचे दागीने व रोख रक्कमेबाबत विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या वाटयाला मिळालेले सोन्याचे दागीने काजल अजय भोसले (रा.वाळुंज, ता.नगर) हिने विक्री केले असल्याचे सांगीतले आहे.



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी समीर बोरा यांची निवड झाल्याबद्दल तसेच महेश नागरी पतसंस्थेच्या संचालकपदी पवन गुंदेचा यांची निवड झाल्याबद्दल जैन ओसवाल युवक संघा (जॉईस) तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सचिन डूंगरवाल, अक्षय बोरा, प्रतीक बाबेल, अमोल कटारिया, संजय पिपाडा, चेतन मुथियान, विशाल भंडारी, राजेश चंगेडिया, मनोज पितळे, गौतम मुथा, सचिन डागा, सचिन मुनोत, सुजित गुगळे, अमित शिंगवी, धीरज पोखरणा, प्रतिक गुगळे, संकेत पोखरणा, रोहित लुणिया, विश्वजित बोरा, वैभव मुनोत, शुभम गांधी, चेतन गांधी, मयुर मुनोत, ऋषभ बोरा, संभव काठेड, ईश्वर कटारिया, साहिल गुंदेचा, आनंद बोरा, तेजस डागा उपस्थित होते.

# माजी सैनिकांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

नगर – जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, त्यांचे विधवा आणि अवलंबित यांनी त्यांची नोंदणी सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे. नोंदणी करतेवेळी डिस्चार्ज बुकची सर्व पाने, बँक पासबुकचे पहिले पान, ईसीएचएस कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, पी.पी.ओ. तसेच फोटो आदी कागदपत्रेही अपलोड करावीत, असेही कळविण्यात आले आहे.

# श्री एकदंत महिला मंडळाचा हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात

## सांस्कृतिक कार्यक्रम बत्काम्मा खेळाने आणली रंगत; बाईपण भारी देवा... या गाण्यावर महिलांनी धरला ठेका...



दातरंगे मळा एकदंत कॉलनी येथील श्री एकदंत महिला मंडळाच्या हळदी कुंकू समारंभात पद्मशाली समाजात प्रसिद्ध असलेला बत्काम्मा खेळ खेळताना महिला.

नगर – दातरंगे मळा, एकदंत कॉलनी येथील श्री एकदंत महिला मंडळाचा हळदी कुंकू कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी पद्शाली समाजात प्रसिद्ध असलेला सांस्कृतिक कार्यक्रम बत्काम्मा खेळण्यात आला. महिलांसाठी विविध मनोरंजन स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमात अनेक महिलांनी वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्य सादर केले. तसेच सहभागी महिला, जेष्ठ महिलांनी बाईपण भारी देवा... या गण्यावर ठेका धरत आनंद लुटत होते. यावेळी विविध क्षेत्रीतील महिला उपस्थित होत्या.

बत्काम्मा हा सासंस्कृतिक खेळ आंध्रप्रदेश आणि तेलंगणा येथे 'स्त्री शक्तीचा उत्सव' म्हणून खेळला जातो. यामध्ये महिला रिंगण करुन मधे बत्काम्मा देवी भवती ऊय्यालो ऊय्यालो बत्काम्मा... उय्यालो बत्काम्मा... असे गाणे म्हणत खेळाला जातो. या सांस्कृतिक कार्यक्रमात महिलांनी दक्षिणात्य पोशाख परिधान सहभागी झाल्या होत्या.

यावेळी विनोदा बेत्ती म्हणाल्या की, दैनंदिन जीवनात महिलांना घरातून बोहर पडण्यासाठी आणि स्वत: आनंदीत ठेवण्यासाठी वेळ मिळत नाही. सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये महिलांसाठी विविध स्पर्धां आणि मनोरंजन कार्यक्रम घेण्यातल्याने त्यांना खर्या अर्थांने एक व्यासपीठ मिळते. आणि रोजच्या कामाच्या व्यापातून त्यांना या कार्यक्रमामुळे थोडे व्यक्त होता येते. विचारांचे अदान प्रदान झाल्याने हसत खेळत आयुष्य जगता येते, असे त्या म्हणाल्या.

यावेळी प्रास्तविकात सौ.स्वाती गाजेंगी म्हणाल्या की, श्री एकदंत महिला मंडळाच्या माध्यामातून महिलांसाठी अनेक सामाजिक उपक्रम तसेच विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. महिलांना एक हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा मंडळाचा उद्देश असतो. त्यांना रोजच्या कामाच्या व्यापातून मनोरंजन व्हावे, यासाठी उखना स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा, विडी वळणे स्पर्धा, पाक कला अशा स्पर्धा मंडळच्यावतीने दरवर्षी रबविण्यात येतात. तसेच आरोग्य विषयी मार्गदर्शन तसेच महिला सक्षमीकरण बद्दल व्याख्यान घेण्यात येतात. महिलांच्या विचारांना चालना मिळावी, यासाठी या हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंडळाच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रमात आलेल्या महिलांना वाणचे वाटप करण्यात आले. यावेळी विविध स्पर्धेमधील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आले. सुत्रसंचालन सौ.किर्ती इरातबत्तीन यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.कविता मंचे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री एकदंत महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

